कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १ जून २०२६

किंमत ४ ₹

## आज चणेरात रास्ता रोको

**रोहा :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हलगर्जी आणि ढिम्म कारभाराचा फटका चणेरा परिसरातील नागरिकांना गेली चार वर्षे बसत आहे. चणेरा-बिरवाडी-पांगलोळी-उसरमार्गे रोहा या महत्त्वाच्या राज्य मार्गाचे काम अद्याप अर्धवट अवस्थेत असून, ३१ मेपर्यंत काम पूर्ण करण्याचे तीन वेळा लेखी आश्वासन देऊनही संबंधित अधिकाऱ्यांनी शब्द पाळला नसल्याने संतप्त ग्रामस्थांनी अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश विचारे यांच्या नेतृत्वाखाली चणेरा ग्रामस्थांनी उद्या सोमवारी (१ जून) चणेरा नाक्यावर रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा दिल्याने पान २ वर

## मान्सून लांबणीवर; शेतकरी चिंतेत

**मुंबई :** महाराष्ट्रात मान्सूनच्या आगमनासाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. प्रशांत महासागरातील अल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनचा पुढील प्रवास मंदावल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, हवामान विभागाने विदर्भासह राज्यातील अनेक भागांत पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. मान्सून लांबणीवर जाण्याच्या शक्यतेमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना पुरेसा पाऊस झाल्याशिवाय पेरणी न करण्याचा सल्ला दिला आहे. अपुऱ्या पावसावर पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट निर्माण होऊ शकते, असा इशाराही दिला आहे.

### वे|ध|क

## आज विद्यार्थ्यांना मिळणार गुणपत्रक

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेची एकत्रित गुणपत्रक आणि प्रमाणपत्र सोमवारी (दि. १) दुपारी तीन वाजल्यानंतर माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहेत. त्यापूर्वी माध्यमिक शाळांना विभागीय मंडळामार्फत सकाळी अकरा वाजता प्रमाणपत्र दिली जाणार आहेत, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिली. राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये दहावीची परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल आठ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने अधिकृत संकेतस्थळांवर जाहीर करण्यात आला. दरम्यान, उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सोमवारी परीक्षेचे गुणपत्रक तथा प्रमाणपत्र आणि तपशीलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप केले जाणार आहे.

## सरकारला लाडक्या बहिणी नकोशा

**मुंबई :** राज्यातील लाडकी बहीण योजनेला सरकारने गेल्या काही महिन्यांत चांगलीच कात्री लावण्यास सुरुवात केली असून, ज्या महिलांनी केवायसी केली नाही किंवा ज्या महिलांचे उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे त्यांना योजनेचा लाभ बंद करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, गेल्या महिन्यात तब्बल ८० लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळणे बंद झाल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता ठाकरेंच्या शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी राज्य सरकारवर टीका करत महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरेंवर जोरदार टीका केली आहे.

## 'ती'ची हत्या नव्हे, आत्महत्या!

**नवीन पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंबावीपाडा जवळील रस्त्यावर पोलिसांना ३ मे रोजी एका महिलेचा मृतदेह ब्लँकेटमध्ये गुंडाळलेल्या अवस्थेत सापडून आला होता. त्यानंतर पोलिसांनी अनोळखी इसमाविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. मात्र, त्या महिलेची हत्या नव्हे तर तिने आत्महत्या केल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. त्यामुळे आता या महिलेने आत्महत्या का केली आणि या महिलेचा मृतदेह रस्त्यालगत कोणी आणून टाकला याचा शोध पोलीस घेत आहेत. त्या महिलेचे नाव रुक्सार मंजूर शेख (३५) असून ती शिवाजीनगर, गोवंडी येथे राहात होती.

## घरासमोर उभी ठेवलेली रिक्षा लंपास

**पनवेल :** पनवेल परिसरात रिक्षा चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने रिक्षा चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खारघर सेक्टर १० येथील कोपरा गावातील रहिवासी राकेश कामोटकर यांची रिक्षा अज्ञात चोरट्याने मध्यरात्री घरासमोरून चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्यामध्ये एक तरुण रिक्षा चोरी करताना स्पष्टपणे दिसत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, राकेश कामोटकर यांनी नेहमीप्रमाणे आपली रिक्षा घरासमोर पार्क करून ठेवली होती. मात्र, पान २ वर



**दगडांची भिंत ढासळली | लोखंडी सळ्या बाहेर | सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष**

# पाल्हे पूल कोसळणार? धायतडकांचे मौनिका?

**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील सहाण-पाल्हे मार्गावरील पुलाची दगडी भिंत ढासळली असून, लोखंडी सळ्या बाहेर निखळल्या आहेत. मागील वर्षभरापासून दुरुस्तीच्या नावाखाली मोठा खर्च झाला असला तरी पुलाची अवस्था गंभीर असल्याचे चित्र दिसत आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, असा आरोप आहे. त्यामुळे नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळा तोंडावर आलेला असताना पुलाच्या पान २ वर

### दगडी भिंतीचे दगड निखळले

पुलाच्या दगडी भिंतीचे दगड निखळले असून, अवजड वाहनांमुळे पूल कधीही कोसळू शकतो. आधीच वारंवार या पुलावर खडी, डांबराचा थर टाकून टाकून पुलाचे वजन वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे आधीच पुलाला स्वतः चाच भार पेलवत नसताना, त्यावरुन अवजड वाहतूक सर्रास सुरू आहे. त्यामुळे हादरे बसून, ऐन पावसाळ्या पावसाच्या पाण्याचा वेगवान प्रवाह दगडांवर आपटून दगडी भिंत कोसळून पूल कोसळण्याची भीती आहे. परंतु, जबाबदार अधिकाऱ्यांना याचे काहीच पडले नसल्याने सर्वसामान्य नागरिकांकडून भीती व्यक्त करण्यात येत आहे

### सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

वर्षभरापासून या पुलाचे काम सुरू आहे. परंतु, पुलाचे संरक्षक कठडे पूर्णतः कोसळले आहेत. अधिकाऱ्यांना कधीही फोन केला तरी काम सुरू आहे, एवढेच उत्तर मिळते. जबाबदार अधिकाऱ्यांनी वर्षभरात एकदा तरी स्थळपाहणी केली का? याबाबत प्रश्न उपस्थित होत आहे. सुधागड तालुक्यातील आमणोली पूल क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक केल्याने १३ मे रोजी कोसळला. सुदैवाने जीवितहानी झालेली नाही. परंतु, पाल्हे पूल कोसळून दुर्दैवाने कोणती हानी झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

> "सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजनशून्य कारभार आणि दूरदृष्टीच्या अभावाचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे. पाल्हे बायपासवरील पूल नागाव, मुरुड, श्रीवर्धनकरांसाठी आर्थिक विकासाचा पूल आहे. याच पुलावरुन हजारो पर्यटक उन्हाळ्यात आणि पावसाळ्यातही ये-जा करतात. अशा वेळी पूल कोसळून पडला तर सार्वजनिक बांधकाम विभाग पर्यायी मार्ग कोठून देणार? पुलाखाली माणसे मेल्यावरच या विभागाला जाग येणार का? सत्ताधारी आणि राजकीय नेत्यांचा वचक या विभागाला राहिला नसल्याने ढिसाळ कारभार सुरू आहे."
>
> - ॲड. राकेश नारायण पाटील, सामाजिक कार्यकर्ते

## खारपाडा येथे अपघात

### दोन दुचाकीस्वारांचा जागीच मृत्यू

**। पेण । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा गावाजवळ पोलीस चौकीसमोर शनिवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, महामार्गावरील अवजड वाहनांच्या बेदरकार वाहतुकीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आदित्य किशोर बल्लाल आणि यश मुकेश बल्लाल (मूळ रहिवासी पाचांबे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी; सध्या वास्तव्य विक्रोळी, मुंबई) हे दोघे युवक दुचाकी क्रमांक एमएच-०३-एफई-५१४३ वरून कोकणातून मुंबईकडे जात होते. शनिवारी रात्री साडेअकरा ते बाराच्या सुमारास खारपाडा येथे पोहोचल्यावर डंपर क्रमांक एमएच-४६-बीएस-३६०४ ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच दादरसागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजीवकुमार ब्राह्मणे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुळ यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतर पंचनामा करून पुढील कार्यवाही करण्यात आली.

प्राथमिक तपासात डंपर चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच चालक मद्यधुंद अवस्थेत होता का, याबाबतही पोलीस तपास करीत आहेत. संबंधित चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची पान २ वर

### मेल्यानंतरही यातना कायम!

## उरणच्या बोरी स्मशानभूमीत मानवी अवशेषांची विटंबना



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

माणूस मेल्यानंतर तरी त्याला सन्मान आणि शांती मिळावी, ही प्रत्येकाची अपेक्षा असते. मात्र, उरण शहरातील बोरी स्मशानभूमीतील धक्कादायक वास्तव पाहता ही अपेक्षाही आता धुळीस मिळाल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. स्मशानभूमीत ना कायमस्वरूपी वॉचमन, ना नियमित स्वच्छता, तर भटक्या कुत्र्यांचा मुक्त संचार असल्याने मानवी अवशेषांची विटंबना होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकारामुळे उरणमध्ये संतापाची लाट उसळली असून, प्रशासनाच्या निष्काळजी कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, स्मशानभूमी परिसरात उघड्यावर पडलेल्या मानवी पान २ वर

## सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मुरबाड तालुक्यातील माळीपाडा येथे सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या कथित मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून २८ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मृत महिलेच्या वडिलांच्या तक्रारीवरून मुरबाड पोलिसांनी पतीसह चार जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कर्जत तालुक्यातील खांडस येथील रहिवासी विष्णू भोईर यांची कन्या देवयानी हिचा विवाह एप्रिल २०१५ मध्ये मुरबाड तालुक्यातील माळीपाडा येथील कृष्णा माळी याच्यासोबत झाला होता. लग्नानंतर काही काळ संसार सुरळीत सुरू होता. मात्र, त्यानंतर पतीकडून माहेरहून पैसे आणण्याची मागणी करत देवयानीला त्रास दिला जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.



तसेच मेहुणा परशुराम भोईर हा टोमणे मारत असल्याचे, तर नणंदा मनिषा भोईर आणि सविता लोंगले या किरकोळ कारणांवरून वाद घालून पतीला भडकवत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यामुळे देवयानीला मानसिक त्रास सहन करावा लागत होता. ती माहेरी आल्यानंतर अनेकदा सासरी होत असलेल्या छळाबाबत कुटुंबियांकडे व्यथा व्यक्त करत असे, अशी माहिती तिच्या नातेवाईकांनी दिली.

दरम्यान, २८ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास माळीपाडा येथील अनिल माळी यांनी देवयानीच्या भावाला फोन करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर कुटुंबीय घटनास्थळी पोहोचले असता देवयानीने घरातील स्वयंपाकघरात पंख्याला बेडशीटच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे आढळून आले.

या घटनेनंतर मृत महिलेचे वडील विष्णू भोईर यांनी मुरबाड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पती कृष्णा माळी, मेहुणा परशुराम भोईर, नणंदा मनिषा परशुराम भोईर आणि सविता प्रदीप लोंगले यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सचिन हुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्याम अरमळकर पुढील तपास करीत आहेत.

## मोक्कामधील दोन फरार आरोपी जेरबंद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत दाखल गुन्ह्यात मागील तीन वर्षांपासून फरार असलेल्या दोन आरोपींना ठाणे ग्रामीण पोलिसांनी अग्निशस्त्रांसह ताब्यात घेतले आहे. ही कारवाई कुळगाव पोलिसांनी बदलापूर-कान्होर मार्गावरील कान्होर गावाजवळील नाकाबंदीदरम्यान केली.

पोलीस उपनिरीक्षक यशवंत कदम यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, नंबर प्लेट नसलेल्या दुचाकीवरून दोन संशयित अग्निशस्त्र घेऊन जाणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आलोक रामानंद यादव (२६, रा. उल्हासनगर-१) आणि पान २ वर

## प्रेमाचे आमिष दाखवून लाखोंची फसवणूक

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

सोशल मीडियासह मेट्रिमोनी साईटच्या माध्यमातून तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या रसायनीतील एका भामट्याला मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. आदर्श म्हात्रे ऊर्फ रुद्रेश गोंधळी (३४, रा. तुराडे, रसायनी) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी फेसबुक, इन्स्टाग्राम आणि मेट्रिमोनी साईटवरून तरुणींशी संपर्क साधत असे. विश्वास संपादन करून लग्नाचे आणि प्रेमाचे आमिष दाखवत त्यांना कर्ज काढण्यास भाग पाडून लाखो रुपये उकळत असल्याचे तपासात उघड झाले आहे. पैसे मिळाल्यानंतर तो संपर्क तोडून फरार होत असे.

या आरोपीविरुद्ध यापूर्वीही अशाच प्रकारच्या फसवणुकीचे गुन्हे दाखल असून, नवी मुंबई पोलिसांनी त्याला अटक केली होती. मात्र, त्यानंतरही त्याचे फसवणुकीचे प्रकार सुरूच असल्याचे समोर आले आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, शंभरहून अधिक महिला व तरुणींना त्याने गंडा घातल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

आतापर्यंत ११ पीडित महिलांनी पुढे येत तक्रारी दाखल केल्या आहेत. नवी मुंबईतील कारवाईची माहिती प्रसारमाध्यमांतून समजल्यानंतर डोंबिवलीतील एका तरुणीने मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. त्यानंतर मानपाडा पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली.या प्रकरणामुळे सोशल मीडिया आणि मेट्रिमोनी संकेतस्थळांवर ओळख झालेल्या व्यक्तींवर सहज विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

## मुलीला गरोदर करून लग्नास नकार

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील सोंडेवाडी येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीशी प्रेमसंबंध प्रस्थापित करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी तेजस राम सांबरी याला खालापूर पोलिसांनी अवघ्या तीन तासांत अटक केली. पीडित मुलगी आठ महिन्यांची गरोदर असल्याचे समोर आल्यानंतर तसेच आरोपीने लग्नास नकार दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी इयत्ता नववीत शिक्षण घेत असून, ती आपल्या आई-वडिलांसमवेत सोंडेवाडी येथे राहते. तिची आरोपी तेजस सांबरी याच्याशी ओळख कर्जत तालुक्यातील आषाणेवाडी येथे एका कौटुंबिक कार्यक्रमादरम्यान झाली होती. त्यानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून दोघांमध्ये पान २ वर


### वीजबिल मात्र पालिकेच्या माथी | सिडकोकडून ४७ लाख खर्चून उभारणी

## ई-टॉयलेट वापरासाठी बंद

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

सार्वजनिक स्वच्छतेसाठी लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या ई-टॉयलेट प्रकल्पाचा कळंबोलीत बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे. कळंबोली वसाहतीतील सुधागड शाळेजवळ सिडकोने सुमारे सात लाख रुपये खर्च करून उभारलेले ई-टॉयलेट अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असून, त्याचा नागरिकांना कोणताही उपयोग होत नाही. विशेष म्हणजे, हे शौचालय अद्याप पनवेल महापालिकेकडे अधिकृतपणे वर्ग करण्यात आलेले नसल्याचे पालिका प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र, बंद असलेल्या या शौचालयाचे वीज देयक दरमहा पनवेल महापालिकेकडून नियमितपणे भरले जात असल्याची माहिती समोर आली आहे.






माहितीनुसार, कळंबोली वसाहती परिसरात सिडकोने सुमारे ४९ लाख रुपये खर्च करून सात ठिकाणी ई-टॉयलेट उभारले होते. नागरिकांना स्वच्छ व पान २ वर

### वापर शून्य, खर्च सुरूच

कळंबोली वसाहतीत सिडकोने उभारलेली सातही ई-टॉयलेट्स सध्या बंद अवस्थेत आहेत. शौचालये पालिकेकडे वर्ग झालेली नसल्याचा दावा प्रशासन करत असताना, त्यांचे वीजबिल मात्र पनवेल महापालिका नियमित भरत आहे. त्यामुळे ई-टॉयलेट नेमके कोणाच्या जबाबदारीवर चालते, असा सवाल उपस्थित होत आहे.

Jai Baba Balak Nath Ji
**HINDUSTAN SECURITY FORCE**
Govt. Licensed & Regd. 50 Years old ISO 9001 :
**Require Male/Female Guards/ Supervisors for Kharghar N M.**
SALARY – Rs. 29,270/- pm, for 8 hrs/Day
Inclusive of : (Basic + All Govt. Benefits + All Holidays)
Age – 18 years above, Above – 8th passed
Walk in with CV, AADHAR & PAN CARD & Education Certificate.
From 1st to 6th June. Time 10:00 - 2:00 pm
Contact: 110, Great Eastern Chamber, Sec-11, CBD Belapur, Navi Mumbai
: <contact@hinsef.com> 8976561636, 9322096476, 9930320513,
www.hinsef.com Bharti Always Open

# स्मार्ट मीटरबाबत जाब विचारणाऱ्यास मारहाणीचा प्रयत्न

## जातीवाचक शिवीगाळ; पाली पोलिसांत तक्रार

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील पेडली येथील रहिवासी राम पवार यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांविरोधात पाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या घरावरील जुने वीजमीटर कोणतीही पूर्वसूचना न देता काढून स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याबाबत जाब विचारण्यासाठी गेले असता, संबंधित अधिकाऱ्यांनी जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आणि मारहाणीचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.



राम पवार यांच्या म्हणण्यानुसार, २७ मे रोजी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुपस्थितीत घरावरील जुने मीटर काढून स्मार्ट मीटर बसविले. याबाबत विचारणा करण्यासाठी ते व त्यांचे पुत्र तथा तिवरे ग्रामपंचायतीचे सरपंच दिनेश पवार संबंधित कर्मचाऱ्यांना भेटले असता, उपअभियंता चात्रे आणि सहाय्यक अभियंता भंडारी यांनी त्यांच्याशी उर्मट वर्तन करत जातीवाचक अपमानास्पद वक्तव्ये केली. तसेच राम पवार यांना जबरदस्तीने वाहनात बसवून अन्य ठिकाणी नेण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (अॅट्रॉसिटी अॅक्ट) कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन राष्ट्रीय जनजातीय आयोग तसेच विविध आदिवासी संघटनांनाही देण्यात आले आहे.

पाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे यांनी चौकशी करून योग्य कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. दरम्यान, संबंधित प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष लागून राहिले आहे.

> “राजिप कातळाचीवाडी या शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या वतीने पालकांनी एक निवेदन दिले आहे. यामध्ये शिक्षक गैरहजर तसेच पोषण आहारा यासंदर्भात निवेदन दिले आहेत. नवीन वर्षात केंद्रप्रमुख विस्तार अधिकारी, तसेच मी या शाळेची चौकशी करून, ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार जे काही सत्य असल्यास कारवाई केली जाईल.”
>
> – दिपा परब, गटशिक्षणाधिकारी, खालापूर

# वाढत्या उष्म्याने नागरिक हैराण

## थंड पेये, फळे आणि माठांना वाढली मागणी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यासह परिसरात वाढत्या उष्णतेने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, रणरणत्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. अंगाची लाही-लाही करणाऱ्या उष्म्यापासून बचावासाठी नागरिक झाडांच्या सावलीचा आधार घेत आहेत. तसेच थंड पेये, कलिंगड, काकडी, कोकम यांसारख्या फळांकडे नागरिकांचा ओढा वाढला आहे.

यंदा वैशाख महिन्यात लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने अनेकांना नाईलाजाने घराबाहेर पडावे लागत आहे. त्यामुळे वाढत्या तापमानाचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे. उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात कंटेनर यार्ड आणि गोदामे असल्याने तापमानात आणखी भर पडत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.




उन्हाळ्यात फ्रिजमधील पाण्यासोबतच मातीच्या माठातील थंडगार पाण्यालाही मोठी पसंती मिळत आहे. माठातील पाण्याची नैसर्गिक चव आणि थंडावा यामुळे बाजारात माठांची मागणी वाढली आहे. मात्र, उरण तालुक्यात फिरत्या राजस्थानी विक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणावर माठ विक्री होत असल्याने स्थानिक कुंभारांपुढे स्पर्धेचे आव्हान निर्माण झाले आहे. स्थानिक माठांची किंमत तुलनेने कमी असली तरी विपणन आणि विक्री तंत्राचा अभाव असल्याने या व्यवसायात परप्रांतीय विक्रेते आघाडीवर असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# महामार्ग अपूर्ण, मग टोल कशासाठी?




- **जनआक्रोश आंदोलनातून संताप व्यक्त**
- **खारपाडा टोल नाका बंद पाडून तीव्र निषेध**

**। पेण । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा टोल नाक्याच्या विरोधात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जनआक्रोश आंदोलनाने आज निर्णायक टप्पा गाठला. २५ मेपासून उपोषण, निदर्शने आणि विविध लोकशाही मार्गांनी सुरू असलेल्या आंदोलनाला प्रतिसाद न मिळाल्याने संतप्त आंदोलनकर्त्यांनी आज थेट खारपाडा टोल नाक्यावर धडक देत टोल वसुली बंद पाडली. प्रथम महामार्ग पूर्ण करा, त्यानंतरच टोल वसूल करा, ही एकमेव मागणी आंदोलनकर्त्यांनी लावून धरली.

आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, ज्या महामार्गासाठी नागरिकांकडून टोल आकारला जात आहे, तो महामार्ग अद्याप पूर्णत्वास गेलेला नाही. अनेक ठिकाणी सर्व्हिस रोडच अस्तित्वात नाहीत. रस्त्यावरील सुरक्षाविषयक कामे अपूर्ण आहेत. वाहनचालक आणि प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा पूर्णतः अभाव आहे. तरीही नागरिकांच्या खिशावर टोलच्या माध्यमातून आर्थिक बोजा टाकला जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

विशेष म्हणजे, खारपाडा टोल नाक्यावर प्रवाशांसाठी शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळावी यासाठी आवश्यक असलेली रुग्णवाहिका व्यवस्था नाही. प्राथमिक आरोग्य सुविधांचाही वानवा असल्याचे आंदोलनकर्त्यांनी निदर्शनास आणून दिले. एका बाजूला सुविधा नाहीत, तर दुसऱ्या बाजूला टोल वसुली मात्र जोमात सुरू आहे. त्यामुळे हा टोलचा झोल असल्याचा घणाघात जनआक्रोश आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी केला.

आज आंदोलनकर्त्यांनी मोठ्या संख्येने टोल नाक्यावर जमून प्रशासन आणि संबंधित यंत्रणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. नागरिकांच्या संयमाचा अंत पाहू नका, असा इशाराही त्यांनी दिला. अनेक वर्षांपासून महामार्गाच्या अपूर्ण कामामुळे कोकणवासियांना त्रास सहन करावा लागत आहे. खड्डे, वाहतूक कोंडी, अपघात आणि अपुऱ्या सुविधा यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. अशा परिस्थितीत टोल वसुली सुरू करणे म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याची तीव्र प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, महामार्ग पूर्ण न करता टोल वसुली सुरू करणे हा जनतेवरील अन्याय आहे. कोट्यवधी रुपये भरूनही नागरिकांना दर्जेदार रस्ता आणि मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर हा टोल जनतेने का भरावा? प्रशासनाने तात्काळ जनतेच्या मागण्यांची दखल घ्यावी, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल. खारपाडा टोल नाक्यावर झालेल्या या आक्रमक आंदोलनामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील टोल वसुलीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जनतेच्या सुविधांपेक्षा महसूल गोळा करण्याला प्राधान्य देणाऱ्या यंत्रणांविरोधात नागरिकांमध्ये वाढता रोष दिसून येत असून, आता प्रशासन या संतापाची कितपत दखल घेते याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरचा पहिला टप्पा कार्यान्वित

## वाढवण बंदरासाठी महत्त्वाचा टप्पा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भारत सरकारच्या डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडियामार्फत उभारण्यात येत असलेल्या मालवाहतुकीसाठीच्या विशेष रेल्वेमार्गाचा जेएनपीए (न्हावा शेवा) ते सफाळे हा पहिला टप्पा २५ मे रोजी कार्यान्वित करण्यात आला. देशातील प्रमुख बंदरांना जोडणाऱ्या या प्रकल्पामुळे मालवाहतुकीचा वेळ आणि खर्च कमी होण्यास मोठी मदत होणार असून, तो वाहतूक क्षेत्रातील ङ्गगेम चेंजरफ ठरणार असल्याचे मानले जात आहे.



रेल्वे मंत्रालयाने याबाबत अधिकृत घोषणा केली असून हा मार्ग वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरचा भाग आहे. जेएनपीटी (नवी मुंबई) ते दादरी (उत्तर प्रदेश) असा सुमारे १,५०६ किलोमीटर लांबीचा हा मालवाहतूक रेल्वेमार्ग आहे. या मार्गावर मालगाड्या ताशी १०० किलोमीटर वेगाने धावू शकतील. तसेच डबल-डेकर कंटेनर आणि १३ हजार टन क्षमतेच्या मालगाड्या चालविण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यात उभारण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी वाढवण बंदरासाठी हा रेल्वे मार्ग महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. केंद्र सरकारने वाढवण बंदरासाठी ७६ हजार २०० कोटी रुपयांची मंजुरी दिली असून, पूर्णत्वास गेल्यानंतर हे बंदर जगातील दहा प्रमुख बंदरांमध्ये स्थान मिळवू शकते. प्रकल्पाचा पहिला टप्पा २०२९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

वाढवण बंदराची देशातील विविध भागांशी रेल्वे आणि रस्तेमार्गे जोडणी करण्याचे कामही वेगाने सुरू आहे. वाढवण ते समृद्धी महामार्ग जोडणारा स्वतंत्र द्रुतगती मार्ग प्रस्तावित असून, या मार्गामुळे पालघर ते नाशिक प्रवासाचा कालावधी पाच तासांवरून अवघ्या दीड तासांवर येणार आहे. या रस्ते प्रकल्पासाठी सुमारे १४ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

वाढवण बंदर आणि त्याच्या जोडणी प्रकल्पांमुळे पालघर जिल्ह्यात रोजगार, उद्योग आणि व्यवसायाच्या नव्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच देशाच्या मालवाहतूक व्यवस्थेला अधिक गती आणि कार्यक्षमता प्राप्त होणार आहे.

# रेवदंडा किनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी | उष्णता व वाहतूक कोंडीची चिंता कायम

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

मे महिन्याच्या अखेरच्या टप्प्यात रेवदंडा समुद्रकिनारा आणि परिसरातील किनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले. उन्हाळी सुट्टीचा शेवटचा टप्पा असल्याने कुटुंबे, युवक-युवती आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने समुद्रकिनाऱ्याकडे आकर्षित झाले. त्यामुळे काही दिवसांपासून मंदावलेली पर्यटकांची संख्या पुन्हा वाढल्याचे दिसून आले.

समुद्रकिनाऱ्यावर बालकांनी वाळूचे किल्ले उभारण्याचा आनंद घेतला, तर युवकांनी छायाचित्रण आणि समुद्रकिनाऱ्यावरील



निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेतला. पर्यटकांच्या वाढलेल्या वर्दळीमुळे स्थानिक हॉटेल्स, खाद्यपदार्थ विक्रेते आणि किरकोळ व्यवसायांनाही दिलासा मिळाला. मात्र, वाढती उष्णता आणि दमट हवामानामुळे अनेक पर्यटक त्रस्त झाले. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी उकाडा मोठे आव्हान ठरत असल्याने अधिक सावली, थंड पिण्याचे पाणी आणि विश्रांती सुविधांची गरज व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, रेवदंडा-चौल-बागमळा मार्ग तसेच अलिबाग-मुरुड रस्त्यावर सुरू असलेल्या रस्ते रुंदीकरण आणि दुरुस्तीच्या कामांमुळे वाहतूक कोंडीची समस्या कायम आहे. सुट्टीच्या काळात सकाळी आणि संध्याकाळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

पेट्रोल-डिझेल दरवाढ, एलपीजी खर्च आणि इतर वाढलेल्या खर्चामुळे काही पर्यटन सेवांचे दर वाढले आहेत. त्यामुळे कुटुंबांसाठी पर्यटनाचा खर्च वाढल्याची भावना पर्यटकांनी व्यक्त केली. याशिवाय, जिल्हा प्रशासनाने २६ मे ते ३१ ऑगस्ट या कालावधीत सुरक्षेच्या कारणास्तव पॅरासेलिंग, बनाना राईड, स्पीड बोट यांसारख्या जलक्रीडांवर बंदी घातल्याने स्थानिक व्यावसायिकांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पर्यटक आणि स्थानिक नागरिकांनी वाहतूक व्यवस्थापन सुधारण्याबरोबरच किनाऱ्यांवर मूलभूत सुविधा वाढवण्याची मागणी केली आहे. योग्य नियोजन आणि सुविधा उपलब्ध झाल्यास रेवदंडा परिसरातील पर्यटनाला आणखी चालना मिळू शकते, असे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

अनोळखी महिलेने घरात प्रवेश करून २९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत हकीकत अशी की, तमन्ना रघुवंशी या खारघर येथे राहात असून, अनोळखी महिलेने त्यांच्या दाराची कडी काढून घरात प्रवेश केला आणि सुटकेसमधील २९ ग्रॅम वजनाचे दागिने चोरी केले. आपले दागिने चोरी झाल्याचे लक्षात येताच तमन्ना यांनी खारघर पोलीस ठाण्यात याबाबतची तक्रार दिली असून, पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## धायतडकांचे मौनिका?

सुरक्षिततेबाबत अद्याप ठोस भूमिका समोर आलेली नसल्याने ‘‘धायतडकांचे मौन का?’’ असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील सहाण बायपास मार्गे नागाव, रेवदंडा, मुरुड आदी ठिकाणी जाण्यासाठी जवळचा मार्ग असलेल्या पाल्हे पुलाची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक होत चालली आहे. पुलाच्या बाजूची दगडी संरक्षक भिंत ढासळली असून, अनेक ठिकाणी लोखंडी सळ्या बाहेर दिसत आहेत. दुरुस्तीचे काम सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी पुलावरून अवजड वाहनांची वाहतूक सुरूच असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याठिकाणी १६ टनांवरील वाहनांना बंदीचे फलक लावण्यात आले आहेत. मात्र, प्रत्यक्षात ३० ते ४० टन वजनाचे डंपर आणि इतर अवजड वाहने दिवस-रात्र या मार्गावरून जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पुलावरील ताण वाढत असून, संभाव्य दुर्घटनेची भीती व्यक्त केली जात आहे.

नागाव, रेवदंडा, मुरुड आणि श्रीवर्धन परिसरासाठी हा पूल महत्त्वाचा दुवा मानला जातो. ऐन पावसाळ्यात पूल कोसळला तर वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे पुलाची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती तसेच अवजड वाहनांवर प्रभावी नियंत्रण आणण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

**अधिकाऱ्यांना परिस्थितीचे गांभीर्य नाही?**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांना परिस्थितीचे गांभीर्य नाही, असा आरोप सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. कारण, वर्षभर दुरुस्तीच्या नावाखाली बंद असलेल्या पुलाची अद्याप डागडुजीच सुरू आहे. जर पूल पडला, तर ऐन पावसाळ्यात पर्यायी मार्ग कोठून देणार आहात? कारण, आधीच अलिबाग-रेवंदडा मुख्य रस्त्यावरील बेली येथील पूल अवजड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

## आज चणेरात रास्ता रोको

प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली आहे.

रोहा-चणेरा हा पर्यायी दळणवळणाचा महत्त्वाचा मार्ग म्हणून शासनाने चणेरा-बिरवाडी-पांगलोळी-उसर मार्गे रस्त्यास मंजुरी देत तब्बल पाच कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र, काम सुरू होऊनही चार वर्षे उलटली तरी रस्ता पूर्ण झालेला नाही. विशेष म्हणजे, काम अपूर्ण असतानाच संबंधित ठेकेदाराला देयके अदा करण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

या रस्त्याचा काही भाग वन विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने वन विभागाची परवानगी मिळाल्यानंतरच काम पूर्ण होईल, असे कारण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वारंवार पुढे करण्यात आले. यासाठी विभागाने वन खात्याशी पत्रव्यवहार केल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात कामाचा वेग अत्यंत संथ राहिला आहे.

यापूर्वी १४ एप्रिल रोजीही ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यावेळी रोहा पोलिसांनी मध्यस्थी करून आंदोलन स्थगित केले

पान १ वरून

होते. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता विजय बागुल यांनी वन विभागाची परवानगी मिळवून ३१ मे २०२६ पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, दिलेली मुदत संपल्यानंतरही काम पूर्ण न झाल्याने ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आहे.

वारंवार आश्वासने देऊनही काम पूर्ण करण्यात अपयशी ठरलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी अध्यक्ष प्रकाश विचारे, सुरेश मोरे आणि अरुण खानविलकर यांनी प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

## खारपाडा येथे अपघात

प्रक्रिया सुरू असल्याचे समजते.

दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहने, डंपर आणि ओव्हरलोड वाहनांच्या वाढत्या वर्दळीमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून वारंवार करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर महामार्गावरील वाहतूक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, मद्यधुंद व बेदरकार वाहनचालकांवर कठोर कारवाई करावी आणि अवजड वाहनांच्या तपासणीत वाढ करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

या दुर्घटनेमुळे मृतांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## उरणच्या बोरी स्मशानभूमीत मानवी अवशेषांची विटंबना

अवशेषांवर भटक्या कुत्र्यांनी ताव मारल्याचे प्रकार समोर आले आहेत. या घटनेची छायाचित्रे पाहून अनेकांच्या भावना तीव्र झाल्या असून, मृतांच्या सन्मानाशी संबंधित प्रश्नावर प्रशासनाचे दुर्लक्ष अक्षम्य असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत गटनेते अतुल ठाकूर आणि नगरसेविका प्रमिला पवार यांनी हा गंभीर विषय सभागृहात मांडला. स्मशानभूमीतील दुरवस्था, अपुरी व्यवस्था आणि मृतांच्या सन्मानाशी होत असलेली तडजोड याकडे त्यांनी लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनीही या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व सदस्यांनी सामाजिक भान ठेवून या प्रश्नाकडे पाहावे, असे आवाहन केले.

मात्र, या चर्चेदरम्यान काही नगरसेवकांनी विरोधाची भूमिका घेतल्याची चर्चा शहरात रंगली असून, मृतांच्या सन्मानाशी संबंधित विषयावरही राजकारण होत असल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या दोघांच्याही भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**उरणकरांचा संतप्त सवाल**

स्मशानभूमीत कायमस्वरूपी वॉचमन का नाही? नियमित स्वच्छतेची व्यवस्था का केली जात नाही? भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात प्रशासन अपयशी का ठरत आहे? मृतांच्या सन्मानाशी निगडित प्रश्नावरही दुर्लक्ष का केले जात आहे? नागरिकांनी स्मशानभूमीत तातडीने वॉचमनची नेमणूक, नियमित स्वच्छता, भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त आणि सुरक्षित अंत्यसंस्कारासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

**एक कोटींची वायू शवदाहिनी धूळ खात**

बोरी स्मशानभूमीत तब्बल एक कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेला अत्याधुनिक वायू शवदाहिनी प्रकल्प गेली दोन वर्षे बंद अवस्थेत पडून असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मृतांच्या सन्मानाशी निगडित असलेल्या या संवेदनशील प्रश्नाकडे नगर परिषद प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष उरणकरांच्या जिव्हारी लागले आहे.

## मुलीला गरोदर करून लग्नास नकार

संपर्क वाढला आणि मैत्रीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले.

आरोपी अधूनमधून सोंडेवाडी येथे येत असे. नोव्हेंबर २०२४ मध्ये त्याने लग्नाचे आमिष दाखवत मुलीला भेटण्यासाठी बोलावले आणि तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यानंतर विविध ठिकाणी वारंवार शारीरिक संबंध ठेवण्यात आल्याचेही पीडितेने पोलिसांना सांगितले.

जानेवारी २०२५ मध्ये आरोपी पीडितेला आपल्या आषाणे येथील घरी घेऊन गेला. काही काळ दोघे एकत्र राहात होते. मात्र, मुलीने लग्नाचा आग्रह धरल्यानंतर आरोपी सतत टाळाटाळ करत होता. दरम्यान, काही काळानंतर तपासणी केली असता ती गरोदर असल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारीनुसार, गरोदरपणातही आरोपी तिच्याशी शारीरिक संबंध ठेवत होता. अखेर २६ मे २०२६ रोजी दुसऱ्या मुलीसोबत राहण्याची इच्छा व्यक्त करत त्याने पीडितेला घराबाहेर काढले. त्यानंतर पीडिता व तिच्या कुटुंबियांनी खालापूर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

गुन्हा दाखल होताच खालापूर पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. कर्जत तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील आषाणेवाडी येथे कोणतेही मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसतानाही पोलिसांनी शोधमोहीम राबवून आरोपीला अवघ्या तीन तासांत ताब्यात घेतले.

याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पॉक्सो अंतर्गतही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे, पोलीस हवालदार सोनावणे व शेवाळे पुढील तपास करीत आहेत.

## मोक्कामधील दोन फरार आरोपी जेरबंद

नितीन युवराज अहिरे (२८, रा. उल्हासनगर-१) यांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान आलोक यादव याच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल तर नितीन अहिरे याच्याकडून दोन धारदार चाकू जप्त करण्यात आले.

याप्रकरणी सफौ. राजेंद्र बाबुराव ठाकणे यांच्या फिर्यादीवरून कुळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान हे दोन्ही आरोपी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यातील मोक्का प्रकरणात सुमारे तीन वर्षांपासून फरार असल्याचे निष्पन्न झाले. तसेच कल्याण तालुका पोलीस ठाण्यातील गुन्ह्यांमध्येही त्यांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे.

ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल लाड, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गिते आणि कुळगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक यशवंत कदम व त्यांच्या पथकाने केली.

## ई-टॉयलेट वापरासाठी बंद

आधुनिक सार्वजनिक स्वच्छतागृह सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश या प्रकल्पामागे होता. मात्र प्रत्यक्षात ही सर्वच ई-टॉयलेट्स बंद अवस्थेत असून, नागरिकांना त्याचा कोणताही लाभ मिळत नसल्याचे दिसून येत आहे.

एकीकडे लाखो रुपयांची सार्वजनिक मालमत्ता वापराविना पडून आहे, तर दुसरीकडे बंद असलेल्या सुविधांचे वीजबिल पालिकेच्या तिजोरीतून भरले जात असल्याने करदात्यांच्या पैशांचा अपव्यय होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या ई-टॉयलेट्सची जबाबदारी नेमकी कोणाची, ती सुरू का करण्यात आली नाहीत आणि वीजबिलाचा भार पालिकेवर का टाकण्यात आला आहे, याबाबत सिडको व पालिका प्रशासनाने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आश्वासनाचा अधिकाऱ्यांना विसर

पालिका करणार होती सर्वे बंद असलेलं हे ई-टॉयलेट शहराच्या स्वच्छतेत अडथळा ठरत असल्याने सर्वेक्षण करून दुरुस्ती करण्याजोगे असलेले टॉयलेट सुरु करण्यात येतील आणि दुरुस्ती करणे शक्य नसलेले टॉयलेट काढून टाकण्यात येतील असे आश्वासन पालिकेकडून काही महिन्यापूर्वी देण्यात आले होते. मात्र, महिने उलटूनही ई टॉयलेटची परस्थिती जैसे थे आहे.

## घरासमोर उभी ठेवलेली रिक्षा लंपास

मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने संधी साधून रिक्षा पळवून नेली. सकाळी रिक्षा जागेवर नसल्याचे लक्षात येताच त्यांनी परिसरात शोध घेतला. मात्र, रिक्षा न सापडल्याने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. फुटेजमध्ये एक तरुण रिक्षा चोरी करताना स्पष्टपणे दिसून आला आहे. या घटनेनंतर खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, नवी मुंबई आणि पनवेल परिसरात गेल्या काही दिवसांपासून रिक्षा चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. विविध पोलीस ठाण्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक तक्रारी दाखल होत असून, रिक्षाचालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी गस्त वाढवून अशा चोरट्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिक्षाचालक आणि नागरिकांकडून केली जात आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



## निवडक



### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नागोठणे** : गुरुकुल राज्यस्तरीय शालेय स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करीत इस्रो संशोधन भेटीसाठी निवड झालेल्या रायगड जिल्ह्यातील चार गुणवंत विद्यार्थ्यांचा नुकताच रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन खात्याचे सभापती वैकुंठ पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये सार्थक सुहास माने (इयत्ता ७ वी, सिकेटी इंग्लिश मिडीयम स्कूल, न्यू पनवेल), विनीत विनोद कापसे (इयत्ता ८ वी, द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय, कोलाड), साई योगेश म्हात्रे (इयत्ता ७ वी, रा. जि. शाळा पिगोंडे, नागोठणे) व कुमारी शुभ्रा सुधीर शिंदे (इयत्ता ७ वी, ग. बा. वडेर हायस्कूल, पाली) यांचा समावेश आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन खात्याचे सभापती वैकुंठशेठ पाटील यांच्या दालनात संपन्न झालेल्या या सत्कार समारंभास भाजप नेत्या गीता पालरेचा, जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, भाजप रोहा तालुका अध्यक्ष महेश ठाकुर, रोहा तालुका शिक्षण सेल प्रमुख अशोक अहिरे, रोहा महिला मोर्चा अध्यक्षा अपर्णा सुटे, सोनाली पडवळ, पल्लवी माने, अनिल वाघ, सोशल मीडिया तालुका अध्यक्ष अनिल खंडागळे, तसेच संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व पालक उपस्थित होते. यावेळी सभापती वैकुंठशेठ पाटील यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच भाजपा रोहा तालुका शिक्षण सेल प्रमुख अशोक अहिरे व त्यांच्या संपूर्ण टीमच्या कार्याचेही त्यांनी कौतुक केले. या सत्काराने विद्यार्थी भारावून गेल्याचे पहावयास मिळाले.

### ऑनलाईन सट्टेबाजीवर कारवाई

**पनवेल :** तालुका पोलिसांनी ऑनलाईन सट्टेबाजी व जुगार रॅकेटवर मोठी कारवाई करत १३ आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे २ लाख ७१ हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई वाकडी येथील परिसरात करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी संगनमत करून भारतात प्रतिबंधित असलेल्या ऑनलाईन गेमिंग ॲप व वेबसाईटच्या माध्यमातून लोकांना सट्टेबाजीस प्रवृत्त केले. यासाठी विविध व्यक्तींच्या बँक खात्यांची माहिती, पासबुक, एटीएम कार्ड, मोबाईल क्रमांक तसेच इतर कागदपत्रांचा वापर करण्यात येत होता. आरोपी ङ्गङ्गलोटस ३६५ङ्कङ्क नावाच्या ॲप/लिंकच्या माध्यमातून क्रिकेटसह विविध खेळांवर ऑनलाईन सट्टा खेळण्याची सुविधा पुरवत असल्याचा आरोप आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपींकडून १७ मोबाईल फोन, ६ लॅपटॉप, ४ लॅपटॉप चार्जर, ४ एक्स्टेन्शन बोर्ड, १० मोबाईल चार्जर, एक वाय-फाय राऊटर, पासबुक, चेकबुक, क्रेडिट व डेबिट कार्ड, सिमकार्ड, पासपोर्ट तसेच लेखनासाठी वापरल्या जाणाऱ्या डायऱ्या जप्त केल्या. जप्त मुद्देमालाची किंमत २,७१,६३० इतकी आहे.या प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता () कलम ३१६(२), ३१८(४), ३(५), महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा १८८७ चे कलम ४ व ५ तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ४३, ६६ आणि ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक दिपाली पाटील (सायबर सेल), सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुरुद्ध गिजे, तसेच पनवेल शहर व पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू आहे.



### व्यावसायिक केक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम

**खांब** : कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), तालुका रोहा, जिल्हा रायगड यांच्या अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना तसेच एक्सेल इंडस्ट्रीज लि.यांच्या प्रायोजकत्वाखाली श्री विवेकानंद रिसर्च अँण्ड इन्स्टिट्यूट, रोहा-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय व्यावसायिक केक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न करण्यात आला.या प्रशिक्षणामध्ये १७ महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रशिक्षणादरम्यान महिलांना एकूण ८ प्रकारचे केक तयार करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये नाचणी, वरी/राजभोग व रवा यांसारख्या पौष्टिक केक प्रकारांचाही समावेश होता. प्रशिक्षणासोबतच महिलांना केक बनविण्यासाठी आवश्यक व्यावसायिक किट तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कृषी विभागाचे अधिकारी तसेच महाराष्ट्र शासनाचे पोलीस अधिकारी सकपाळ व श्रीमती पेटकर उपस्थित होते. त्यांनी महिलांना संरक्षण, सुरक्षितता व स्वावलंबन या संदर्भातही महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी प्रशिक्षक म्हणून हर्षदा दगडे यांनी महिलांना केक तयार करण्याचे सविस्तर प्रशिक्षण दिले. तसेच संस्थेची माहिती प्रसाद दगडे व प्रसाद भोईर यांनी उपस्थितांना दिली. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. दरम्यान या उपक्रमाचे समाजातील सर्वच स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

# बोगस बियाण्यांचा सापळा!

## कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना सावधगिरीचा सल्ला

**। रायगड । प्रतिनिधी ।**

खरीप हंगामाची चाहूल लागताच रायगड जिल्ह्यातील शेतकरी पेरणीच्या तयारीला लागले आहेत. भात, भाजीपाला आणि इतर पिकांच्या बियाण्यांच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी वाढू लागली आहे. मात्र, याच काळात बोगस बियाणे विकणारे एजंट, बनावट कंपन्या आणि अप्रमाणित व्यापारी सक्रिय झाल्याने शेतकऱ्यांसमोर फसवणुकीचा मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे बियाणे खरेदी करताना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

**बियाणे घेतांना काय काळजी घ्यावी**

बियाण्याच्या प्रत्येक पिशवीवर असलेला प्रमाणपत्र क्रमांक, उत्पादन कंपनीचे नाव, पॅकिंग तारीख, वैधता कालावधी, अंकुरण क्षमता आणि शुद्धतेची माहिती तपासणे आवश्यक असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

शासनमान्य आणि नोंदणीकृत विक्रेत्याकडूनच बियाणे खरेदी करावे, असेही सांगण्यात आले आहे. अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला किंवा बाजारपेठांमध्ये स्वस्त दरात बियाणे देण्याचे आमिष दाखवले जाते. मात्र, अशी बियाणे अप्रमाणित किंवा निकृष्ट दर्जाची असण्याची शक्यता असते. त्यामुळे आकर्षक जाहिराती आणि अधिक उत्पादनाच्या दाव्यांना बळी पडू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

**पावती जपून ठेवण्याचा सल्ला**

शेतकऱ्यांनी खरेदी करताना हमखास बिल घ्यावे आणि ते सुरक्षित ठेवावे. बियाण्यांची पिशवी, टॅग आणि खरेदीची पावती भविष्यात महत्त्वाचा पुरावा ठरू शकते. बियाणे उगवले नाही किंवा फसवणुकीचा संशय आल्यास तालुका कृषी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय किंवा ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे तक्रार करता येणार आहे.

### कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन

दरवर्षी खरीप हंगामात बियाण्यांची उगवण न होणे, कमी उत्पादन मिळणे किंवा चुकीच्या वाणाची बियाणे विक्री झाल्याच्या तक्रारी समोर येतात. अनेक वेळा शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागते. परिणामी आर्थिक फटका बसतो आणि संपूर्ण हंगाम धोक्यात येतो. त्यामुळे यंदा बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी कोणतीही घाई न करता सर्व बाबी तपासून खरेदी करावी, असा इशारा कृषी अधिकाऱ्यांनी दिला आहे.




> खरीप हंगामात बाजारात बोगस बियाण्यांची विक्री होण्याची भीती अधिक असते. अशावेळी शेतकरयांनी सावध राहणे गरजेचे आहे. कृषी विभागानेही अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कंबर कसली आहे. विविध भरारी पथके तयार करण्यात आली असून त्यांच्या माध्यमातून गैरप्रकारांवर नजर राहणार आहे.
>
> - वंदना शिंदे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी

## पाणी फाऊंडेशनतर्फे शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**। खांब । प्रतिनिधी ।**

पावसाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी शेतीची योग्य तयारी करून आधुनिक व सेंद्रिय पद्धतींचा अवलंब करावा, या उद्देशाने पाणी फाऊंडेशन यांच्या वतीने कृषी मार्गदर्शनपर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कृषी अधिकारी तसेच परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सहा.कृषी अधिकारी चिल्हे अमित आढारी,कोलाड अनिकेत ननावरे,भालगाव विवेक खांडेकर,नागोठणे अनामिका मोरे,ऐनघर ऋषिकेश कदम आदी अधिकारी वर्गासह धोंडू कचरे, सखाराम कचरे, पांडुरंग गोसावी, चंदू गोसावी, गणेश भादावकर, सुदाम जाधव, सहदेव कचरे, यशवंत माहित, चंद्रकांत शेलार, दामोदर शेलार, जगदीश गोसावी, सचिन जाधव, विश्वास राऊत, यमुना कचरे, सुशीला कचरे, सविता कचरे, माई जाधव, पूजा गोसावी, संगीता कचरे, सहादेव बाईत, सुदाम कचरे आदी शेतकरी बांधव भगिनी उपस्थित होते.

यावेळी शेतीची मशागत, पेरणीपूर्व तयारी, योग्य बियाण्यांची निवड, बियाणे प्रक्रिया, माती परीक्षणाचे महत्त्व तसेच पीक उत्पादन वाढीसाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय रासायनिक खतांचा कमी वापर करून सेंद्रिय शेतीकडे वाटचाल करण्यासाठी दशपर्णी द्रावण तयार करण्याची पद्धत समजावून सांगण्यात आली.

## समुद्रकिनारी कचऱ्याचे साम्राज्य

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन नगर परिषदेने श्रीवर्धन शहरातील कचरा उचलण्याचे, गटारे साफ करण्याचे व समुद्र किनारपट्टीवरील साफसफाई करण्याचे कंत्राट एका खासगी कंपनीला दिले होते. सदर कंपनीच्या निविदेची मुदत संपल्यामुळे मागील दोन महिन्यांपासून हे काम बंद पडले होते. परंतु आता नवीन निविदा मंजूर झालेली असून कामाची वर्कऑर्डर सुद्धा देण्यात आलेली आहे. कंत्राटी सफाई कामगार कामावर हजर झाल्याचे चित्र शहरामध्ये पाहायला मिळत आहे. परंतु असे असतानाही श्रीवर्धन समुद्रकिनारा हा पूर्णपणे अस्वच्छ झालेला असून त्याची योग्य पद्धतीने सफाई लवकरात लवकर करून घ्यावी. अशी मागणी पर्यटकांसह नागरिकांमधून केली जात आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनारी सुशोभित असा धूप प्रतिबंधक बंधारा बांधलेला आहे. सदर बंधाऱ्यावरती गेले कित्येक दिवसात झाडू मारलेली नसल्यामुळे वाळू पसरलेली आहे. त्याचप्रमाणे पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिकच्या पिशव्या, इतर कचरा, खाद्यपदार्थांचे कंटेनर्स, प्लास्टिकचे ग्लास व फुटलेल्या बिअरच्या बाटल्या यांचा खच पडलेला पाहायला मिळत आहे. नगरपरिषदेने आणलेली आहे. परंतु सदर मशीनचा वापर हा अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याने किनारपट्टीवरील कचरा तसाच आहे.


## कासाडी नदी प्रदूषणाच्या विळख्यात

### संयुक्त पाहणीत गंभीर बाबी उघड; दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट रसायनी यांच्यावतीने बुधवारी (दि.२७) रोजी कसाडी नदी प्रदूषण प्रकरणी संयुक्त पाहणी करण्यात आली. कासाडी नदी तळोजा एमआयडीसी परिसरातील रासायनिक उद्योगांकडून सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे गंभीररीत्या प्रदूषित झाल्याचे या पाहणीत निदर्शनास आले.

संयुक्त पाहणीदरम्यान परिसरात अनेक ठिकाणी तीव्र दुर्गंधी पसरलेली आढळून आली. विविध नाले व गटारे रासायनिक मिश्रित पाण्याने भरलेली दिसून आली. काही कारखाने दिवसाढवळ्या रासायनिक सांडपाणी सोडताना आढळल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला.



कासाडी नदी प्रदूषणासंदर्भात यापूर्वी राष्ट्रीय हरित लवाद यांनी मोठी कारवाई करत एमआयडीसी तसेच अनेक कंपन्यांवर मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई केली होती. तसेच नदी पुनरुज्जीवनासाठी मोठा निधी उपलब्ध करून देत भविष्यात कोणतेही प्रदूषण होणार नाही याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर निश्चित केली होती. मात्र, तरीही पुन्हा मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याने पर्यावरणप्रेमी व नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

यावेळी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गोविंद जाधव यांनी सांगितले की, नवी मुंबई येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी आपले कर्तव्य प्रभावीपणे पार पाडत नसल्यामुळे कासाडी नदीचे प्रदूषण पुन्हा गंभीर पातळीवर पोहोचले आहे.

या संयुक्त पाहणीत राजू इजुरकर, उमेश जाधव, संतोष मोहरे, अरुण गोविंद जाधव, संदेश मेंगाळ, राकेश भोईर, संजय ओगले, ॲड. सिद्धी प्रमोद बामणे, स्वाती कदम, नितीन जीवने, रोहित इंगळे, दिगंबर गायकवाड आदी उपस्थित होते.

## आचारसंहितेमुळे सिडकोच्या भरतीला ब्रेक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे सिडको महामंडळाच्या भरती प्रक्रियेला पुन्हा ब्रेक लागला असून विविध संवर्गांचे अंतिम निकाल आता निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच जाहीर होणार असल्याचे सिडको प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आधी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे रखडलेली भरती प्रक्रिया आता पुन्हा विलंबाच्या भोवऱ्यात सापडल्याने हजारो उमेदवारांमध्ये नाराजी वाढली आहे.

सिडको महामंडळाने २०२३ ते २०२५ या कालावधीत विविध १० संवर्गातील १९२ पदांसाठी अभियांत्रिकी, नियोजन, सर्वसाधारण गट, लेखा, वास्तुशास्त्र अशा विविध विभागांकरीता भरती प्रक्रिया सुरू केली. या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षेसाठी सिडको मंडळाने आय. बी. पी. एस या बाह्य संस्थेला काम सोपवले होते. या संस्थेने त्यांच्याकडे उपलब्ध तारखेनुसार मागील वर्षी जून व जुलै महिन्यात पूर्ण केल्या.

सिडकोचे डॉ. राजा दयानिधी यांनी याची गंभीर दखल घेत पात्र उमेदवारांची छाननी, पडताळणी व फेर तपासणी त्यानंतर नियुक्ती पत्र देण्याच्या प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर सिडकोने खुलासा प्रसिद्ध करत भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे स्पष्ट केले.

सिडकोच्या म्हणण्यानुसार, १० पैकी ४ संवर्गांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून संबंधित उमेदवार सेवेत रुजू झाले आहेत. आणखी दोन संवर्गांचे निकाल पुढील काही दिवसांत जाहीर करण्याची तयारी सुरू आहे. उर्वरित चार संवर्गांची नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

> सिडको मंडळाने एका संवर्गातील पदांचे निकाल सुद्धा जाहीर केले. मात्र या दरम्यान निवडणूकीची आचारसंहिता जाहिर झाली. परंतू आचारसंहितेच्या काळात संबंधित उमेदवारांनाही नियुक्तीपत्र देता येत नाही. सिडको मंडळाने १८ ते २५ मे या दरम्यान सर्व संवर्गातील निकाल जाहीर करणे आणि नियुक्तीपत्र देणे ही प्रक्रिया करण्याचे नियोजनही केले होते. मात्र निवडणूकीच्या आचारसंहिता लागू झाल्याने आचारसंहिता संपल्यावरच तातडीने पात्र उमेदवार आणि पडताळणीनंतर नियुक्तीपत्र देण्यात येईल.
>
> - डॉ. राजा दयानिधी, सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको मंडळ

## अभियंता अनिकेत भोसले यांची बदली



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील रचना सहाय्यक पदावर असणारे अनिकेत भोसले यांची बदली ठाणे जिल्ह्यातील शहापुर नगरपंचायत या ठिकाणी बदली झाल्याने कर्मचारी, नागरिक तसेच विविध सामाजिक संघटनांमध्ये हळहळीची भावना व्यक्त होत आहे.


रचना सहाय्यक अभियंता-अनिकेत भोसले यांनी कार्यालयीन कामकाजात प्रामाणिकपणे व तत्परतेने पारदर्शकता राखत नागरिकांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य दिले.अनेक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा केला होता विकासकामे, बांधकाम परवानग्या तसेच विविध प्रशासकीय प्रक्रियांमध्ये त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला होता.त्यांच्या बदलीनिमित्त सहकारी कर्मचारी व स्थानिक नागरिकांनी त्यांना शुभेच्छा देताना त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे कार्यालयाची प्रतिमा उंचावली असून, त्यांची उणीव निश्चितच जाणवेल, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

यावेळी कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर यांनी नगरपरिषदेच्या वतीने रचना सहाय्यक अभियंता अनिकेत भोसले यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी सतेज निमकर, प्रकाश आरेकर, सोनल पाटील, आशितोष पाटील, अभि चांदोरकर, रामकृष्ण भिसे, सतिष जंजिरकर, सुदेश माळी, प्रज्वल गुरव, दिपक शिंदे, पल्लवी पडवळ, नम्रता करडे, श्वेता विरकुड,स्मिता मुरुडकर, शुभ्रा कारभारी आदी उपस्थित होते.

## संजय गुंजाळ यांची पुरस्कारासाठी निवड

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

कोकणमराठीसाहित्यपरिषदेचे रायगड जिल्हा अध्यक्ष,प्रियदर्शनी फाऊंडेशनतर्फे पंडित नेहरू समाजरत्न पुरस्कार प्राप्त संजय गुंजाळ यांची राष्ट्रीय ओबीसी, बहुजन शिक्षक संघाच्या डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसीरत्न पुरस्कार-२०२६ साठी निवड करण्यात आली आहे. कला, साहित्य,सांस्कृतिक क्षेत्रातील संजय गुंजाळ यांचे कार्य उल्लेखनीय असून गेली वर्षे कलासागर नाट्य संस्थेचे अध्यक्ष म्हणून यशस्वी धुरा सांभाळली आहे. त्यांना सेवेची पोच पावती यांची डॉ. पंजाबराव देशमुख निवड करण्यात आली आहे.




### मंत्री गडकरींनी दिलेली डेडलाईन संपणार | मुंबई-गोवा हायवेचे काम अपूर्ण

# कोकणवासियांचा जीव टांगणीला!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग (एनएच-६६) क्र. ६६ च्या चौपदरीकरणाचे काम अद्याप अपूर्ण असल्याने कोकणवासीयांसह वाहनचालक आणि प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी ३१ मे पर्यंत महामार्गाचे बहुतांश काम पूर्ण होईल, असे संकेत दिले होते; मात्र, प्रत्यक्ष मे महिना संपत आला तरी अनेक ठिकाणी काम अत्यंत संथगतीने सुरू असून, हा महामार्ग पूर्ण होण्यासाठी अजून काही महिने लागण्याची स्पष्ट चिन्हे आहेत.

रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक टप्प्यांमध्ये रस्त्यांचे काम अजूनही रखडलेले आहे. महामार्गावर मुख्य गावांमध्ये सेवारस्ते (सर्व्हिस रोड) तयार नसल्याने वाहनांना अरुंद आणि खड्डेमय मार्गावरून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. विविध ठिकाणी उड्डाणपूल, नाले, रस्त्यांच्या साईडपट्ट्या आणि डांबरीकरणाची कामे अद्याप अपूर्ण आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत महामार्गावरील धुळीमुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालक पुरते त्रस्त झाले होते. आता मॉन्सून अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.



### पर्यटन आणि व्यापाराला फटका

स्थानिक नागरिक, व्यापारी आणि प्रवासी संघटनांकडून महामार्गाच्या कामाचा वेग वाढवण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. महामार्ग रखडल्यामुळे कोकणातील पर्यटन, वाहतूक व्यवस्था आणि स्थानिक व्यापारावर अत्यंत विपरीत परिणाम होत असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

### ठेकेदारांचे दावे कागदावरच!

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि संबंधित ठेकेदारांकडून काम युद्धपातळीवर सुरू असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थिती अत्यंत बिकट आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी किमान धोकादायक ठिकाणांची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



# नालायकी आणि दांडगाई

साधं काम आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे. पण मोदी सरकारला तेही जमत नाही. ते वारंवार नापास होत आहे. तेही एक ठीक. पण आपली नालायकी झाकण्याचा त्याचा प्रयत्न अधिक वाईट आहे. त्यातही आक्षेपार्ह म्हणजे या झाकपाकीसाठी पोलिसी दडपशाहीचे मार्ग ते अवलंबत आहे. विद्यार्थी नापास झाला तर त्याला पुन्हा त्याच वर्गात बसावे लागते. त्याचे नुकसान होते. पण परीक्षा घेण्यात सरकार नापास झाले तर लक्षावधी मुलांना त्रास होतो. सध्या हाच त्रास मुले झेलत आहेत. आधी वैद्यकीय प्रवेशासाठीची पूर्वपरीक्षा रद्द झाली. त्याचे पेपर फुटले. कालपरवा नीटची विद्यापीठासाठीची प्रवेश परीक्षा उशिराने सुरू झाली. तांत्रिक विलंब असे कारण त्यासाठी देण्यात आले. मात्र मुलांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. याच दरम्यान सीबीएसई बोर्डाच्या परिक्षेतील गोंधळ समोर आले आहेत. सीबीएसई म्हणजे दिल्ली बोर्ड. सध्या मराठी लोकांना याचे भयंकर आकर्षण वाटते. आपल्या आधीची पिढी ज्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्ड म्हणजेच एसएससी बोर्डातून शिकले ते आता त्यांना मागास वाटते. सीबीएसईचा अभ्यासक्रम केला की डॉक्टर आणि इंजिनिअरिंग सोपे जाते, त्यासाठीची तयारी नववी दहावीतच होते असा एक गोड समज सर्वत्र आहे. परिणामी महाराष्ट्रातल्या अनेक जुन्या व नव्या शाळांनी सीबीएसई बोर्डाचे मांडलिकत्व किंवा सदस्यत्व घेतले आहे. पण याच बोर्डाच्या परिक्षांमधले घोळ आता समोर आले आहेत. यंदा बोर्डाच्या दहावी व बारावी परिक्षांचे पेपर संगणकावरच तपासले गेले. याला म्हणतात ऑन स्क्रीन मार्किंग. एरवी हे पेपर म्हणजे, विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तरपत्रिका, शिक्षकांच्या घरी किंवा त्यांच्या शाळांमध्ये पाठवले जातात. तिथे ते त्यांची तपासणी करतात व बोर्डाला परत पाठवतात. पण यामध्ये घोटाळे होऊ शकतात असा साक्षात्कार बोर्डाला झाला. शिवाय उत्तरपत्रिकांची अधलीमधली पाने तपासलीच न जाणे, गुणांची बेरीज करताना त्यात चुका होणे असे प्रकारही घडतात. हे सर्व टाळण्यासाठी ऑन स्क्रीन मार्किंगची पध्दत स्वीकारण्यात आली असे सांगितले गेले. जे जे संगणकाच्या आधारे केले जाते ते ते उच्च दर्जाचे, बिनचूक अशी एक अंधश्रध्दा नव्याने आपल्या समाजात तयार झाली आहे. बोर्डाचे पेपर असे तपासायला देणे हाच त्याच अंधश्रद्धेचा भाग होय.

### तक्रारींचा पाऊस

प्रत्यक्षात या अंधश्रध्देचा दंभस्फोट लगेचच झाला. चॅनलवाल्यांच्या भाषेत यालाच भंडाफोड म्हणतात. या ऑनस्क्रीन मार्किंगद्वारे तपासल्या गेलेल्या पेपरमध्ये असंख्य चुका असल्याचे आता समोर आले आहे. या परिक्षेला सुमारे एकोणीस लाख विद्यार्थी बसतात. त्यातल्या चार लाख विद्यार्थ्यांनी बोर्डाकडे फेरतपासणीसाठी अर्ज केले आहेत. म्हणजेच त्यांना आपल्या गुणांबाबत वा उत्तरपत्रिका ज्या रीतीने तपासल्या गेल्या त्याबाबत शंका आहेत. यातल्या असंख्य विद्यार्थ्यांनी आपल्या शंका एक्स वगैरे सोशल मिडिया फलाटांवरून जाहीर केल्या आणि बोर्डाच्या अब्रूची लक्तरे काढली. म्हणजे ज्या चुका टाळण्यासाठी संगणकाचा आधार घेण्यात आला त्याच किंवा त्याहून अधिक चुका या ऑनस्क्रीन मार्किंग पध्दतीत झालेल्या दिसल्या. पेपरची पाने गहाळ, भलतीच पाने भलत्याच ठिकाणी जोडलेली, काही पाने तपासलेलीच नाहीत असे असंख्य प्रकार समोर आले. यातले एक उदाहरण विशेष गाजले. या तपासलेल्या उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना पाहायला उपलब्ध असतात. एका विद्यार्थ्याला त्यात असे आढळले की, आपल्या भौतिकशास्त्राच्या पेपरमध्ये इतर कोण्या भलत्याच उत्तरपत्रिकेची पाने घुसलेली आहेत. त्यामुळे आपल्याला जितके मिळायला हवे तितके गुण मिळालेले नाहीत. त्याची पोस्ट येताच त्याला हा विद्यार्थी पाकिस्तानी असल्याचा प्रचार करण्यात आला. भारतीय बोर्डाला बदनाम करण्यासाठी रचले जात असलेले कारस्थान असल्याची कावकाव मोदींच्या भक्तांनी सुरू केली. पण शेवटी ज्याचे जळते त्याला कळते. त्यामुळे ज्यांचे गुण गेले त्यांनी अधिक गिल्ला केला. शेवटी झक्कत काही चुका झाल्या असणे शक्य आहे हे सीबीएसईला मान्य करावे लागले. मात्र हे होतानाच यामध्ये मोठा भ्रष्टाचार किंवा घोटाळा झाला असावा अशी शक्यता समोर आली आहे. राहुल गांधी यांनी हे प्रकरण लावून धरले असून या प्रकरणात अडकलेल्या कंपनीबाबत काही शंका उपस्थित केल्या आहेत.

### संशयास्पद कंपनीला कंत्राट

मुळात वर्षानुवर्षे रुढ असलेली प्रत्यक्ष पेपर तपासणीची पद्धत बंद करून ऑनस्क्रीन मार्किंग किंवा ओएसएमद्वारे करण्याचा निर्णय अत्यंत घाईघाईने घेण्यात आला. गेल्या वर्षी जूनमध्ये याची बैठक घेण्यात आली. त्याच वेळी सीबीएसईच्या नियामक मंडळाच्या अनेक सदस्यांनी याची इतक्या लगेच अंमलबजावणी करू नये अशी सूचना केली होती. पण तिच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. हा निर्णय रेटण्यामागे केंद्रीय शिक्षण खात्यातल्या किंवा अन्य कोणाचे तरी हितसंबंध अडकलेले असावेत. कारण प्रत्यक्ष हातात धरून उत्तरपत्रिका तपासण्याची वर्षानुवर्षांची सवय असलेल्यांना एकदम तो संगणकावर वाचणे व मार्क किती द्यायचे ते ठरवणे हे सोपे नव्हते. अनेकदा उत्तरपत्रिकेतली दीर्घ उत्तरे वाचत जाताना शिक्षक मागेपुढे तो विद्यार्थी काय म्हणतो आहे हे तपासून पाहतात. इतर प्रश्नांची उत्तरे त्याने कशी लिहिली आहेत हेही अजमावून पाहत असतात. मात्र संगणकाच्या आधारे पेपर तपासणीत यावर मर्यादा आल्या. बहुसंख्य शिक्षकांना याची सवय नव्हती. त्यांना जवळपास कोणतेही प्रशिक्षण देण्यात आले नाही. सीबीएसईचे देशभरात बावीस विभाग आहेत. या विभागांमध्ये या तपासणी पद्धतीच्या चाचण्या व प्रशिक्षण होणे गरजेचे होते. ते झाले नाही. दिल्लीतल्या पाच-सहा शाळांमध्ये अत्यंत जुजबी चाचण्या घेऊन पद्धत लागू करण्याचा निर्णय झाला. १७ फेब्रुवारीला बोर्डाच्या परीक्षा सुरू झाल्या. त्याच्या केवळ आठ दिवस आधी यंदापासून पेपर तपासणीची पद्धत बदलणार असल्याची घोषणा झाली. देशभरातील शाळा किंवा शिक्षकांना याबाबत काहीही विचारात घेतले गेले नाही. या पध्दतीमुळे पेपर तपासण्याचा वेळ वाचेल व निकाल लवकर लागेल असा दावा केला गेला. तोही पूर्ण खोटा निघाला. परीक्षा झाल्यापासून निकाल लागेपर्यंत गेल्या वर्षीइतकाच कालावधी लागला. या नव्या तंत्रासाठी कोएम्ट नावाच्या कंपनीला कंत्राट दिले गेले. यापूर्वी तेलंगणात याच कंपनीविरुद्ध बऱ्याच तक्रारी आल्यानंतर तिचे कंत्राट रद्द केले गेले होते. तिला केंद्रातले कंत्राट देण्यामागे काय काळेबेरे आहे असा सवाल राहुल गांधी यांनी केला आहे. दुर्दैवाने याचे उत्तर मोदी सरकार देणार नाही. असे भ्रष्टाचार दडवणे आणि विरोधकांना दाद न देणे हीच यांच्या कारभाराची शैली आहे. ओएसएम नावाच्या या तंत्रातल्या भानगडींचा इतका भंडाफोड झाल्यानंतर सरकार पुन्हा आपली पापे झाकण्यास पुढे सरसावले. त्याने देशभरातील सीबीएसई शाळांच्या मुख्याध्यापकांना ही पद्धत कशी उत्तम आहे याचे व्हिडिओ रील्स करून ते प्रसारित करण्याचा आदेश दिला. या मुख्याध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांवरही अशीच जबरदस्ती केल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. ज्या शिक्षण क्षेत्राने व त्यातील गुरुजनांनी मुलांवर सत्याचे व न्यायाचे संस्कार करणे अपेक्षित आहे तेच या भानगडींमध्ये सामील होत आहे ही यातील अत्यंत दुःखाची बाब आहे. या देशाची पुरती वाट लावण्याचे मोदी सरकारने ठरवलेले आहे.

---

**विचार**

# ऊर्जेची तरतूद, पण शेतकरी चिंतेत

***देशातील ऊर्जेच्या वाढत्या मागणीची पूर्तता करताना अणुऊर्जेकडे वळताना २०४७ पर्यंत ठरवलेले शंभर गीगावॅट उर्जेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक हवी आहे. दुसरीकडे, साखरेवरील निर्यातबंदीने साखर कारखाने कर्जबाजारी होण्याचा धोका निर्माण झाला. त्याच वेळी लंडनमध्ये इंग्रजांइतकीच भारतीयांची प्रॉपर्टी उभी रहात असल्याची रंजक माहिती समोर आली आहे.***



**महेश देशपांडे**

देशातील ऊर्जेच्या वाढत्या मागणीची पूर्तता करताना कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी अणुऊर्जेकडे वळण्याशिवाय पर्याय नाही. २०४७ पर्यंत ठरवलेले शंभर गीगावॅट उर्जेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक हवी आहे. दरम्यान, साखरेवरील निर्यातबंदीने साखर कारखाने कर्जबाजारी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्याच वेळी लंडनमध्ये इंग्रजांइतकीच भारतीयांची मालमत्ता उभी रहात असल्याची रंजक माहिती समोर आली आहे.

भारताने २०४७ पर्यंत शंभर गीगावॅट अणुऊर्जा क्षमता उभारण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित केले आहे; मात्र हे लक्ष्य गाठण्यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्ती पुरेशी ठरणार नाही. त्यासाठी अभूतपूर्व आर्थिक गुंतवणूक, वेगवान प्रकल्प अंमलबजावणी, तांत्रिक आत्मनिर्भरता आणि दीर्घकालीन धोरणात्मक सातत्य आवश्यक असेल. 'द एनर्जी अँड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट' (टीईआरआय) यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात भारतासमोरील याच आव्हानांचा परामर्श घेतला आहे. या अहवालानुसार, २०४७ पर्यंत शंभर गीगावॅट अणुऊर्जा क्षमता निर्माण करण्यासाठी देशाला तब्बल २३ ते २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागणार आहे. आजच्या घडीला भारताची अणुऊर्जा निर्मिती क्षमता केवळ ८.८ गीगावॅट इतकी आहे. सध्या सुरू असलेल्या आणि बांधकामाधीन प्रकल्पांची पूर्तता झाल्यास २०३०-३२ पर्यंत ही क्षमता सुमारे २२ गीगावॅटपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे; परंतु त्यानंतरचा टप्पा अधिक कठीण आणि निर्णायक ठरणार आहे. कारण उर्वरित कालावधीत शंभर गीगावॅटचे लक्ष्य गाठण्यासाठी दरवर्षी सरासरी ४.५ गीगावॅट इतकी नवीन क्षमता सातत्याने वाढवावी लागणार आहे. भारतीय ऊर्जा क्षेत्राच्या इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि एवढ्या वेगाने अणुऊर्जा विस्तार करण्याचा हा पहिलाच प्रयत्न असेल. अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे, की भारताने आतापर्यंत ज्या गतीने अणुऊर्जा प्रकल्प उभारले आहेत, त्या तुलनेत भविष्यातील अपेक्षित विस्ताराचा वेग अनेक पटींनी अधिक असेल. त्यामुळे केवळ पारंपरिक प्रशासकीय पद्धतींनी हे उद्दिष्ट साध्य होणे कठीण आहे. त्यासाठी जमीन संपादन, पर्यावरणीय मंजुरी, प्रकल्प वित्तपुरवठा, तांत्रिक उपकरणांची उपलब्धता, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि सुरक्षाविषयक मानके या सर्व बाबींमध्ये व्यापक सुधारणा कराव्या लागतील.

भारताच्या ऊर्जा गरजा झपाट्याने वाढत आहेत. औद्योगीकीकरण, शहरीकरण आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या विस्तारामुळे विजेची मागणी सातत्याने वाढणार आहे. त्याच वेळी कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हवामान बदलाच्या संकटाला उत्तर देण्यासाठी स्वच्छ ऊर्जेकडे वळणेही अपरिहार्य झाले आहे. अणुऊर्जेची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे ती कमी कार्बन उत्सर्जनासह मोठ्या प्रमाणात वीज निर्माण करू शकते. कोळशावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि ऊर्जा सुरक्षेला बळकटी देण्यासाठी भारताला अणुऊर्जेचा विस्तार करणे आवश्यक आहे; मात्र या क्षेत्रातील गुंतवणूक अत्यंत भांडवली स्वरूपाची असते. एका मोठ्या अणुऊर्जा प्रकल्पासाठी हजारो कोटी रुपयांची आवश्यकता भासते आणि त्याची उभारणी पूर्ण होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. त्यामुळे दीर्घकालीन वित्तपुरवठा आणि धोरणात्मक स्थैर्य ही यशाची प्रमुख अट ठरणार आहे. भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राचा आतापर्यंतचा इतिहास पाहिला, तर या क्षेत्राचा विकास तुलनेने मंद गतीने झाला आहे. यामागे तांत्रिक निर्बंध, आंतरराष्ट्रीय निर्बंध, इंधन पुरवठ्यावरील मर्यादा आणि स्थानिक विरोध अशा अनेक कारणांचा प्रभाव राहिला आहे. २००८ मधील भारत-अमेरिका अणुकरारानंतर परिस्थितीत काही प्रमाणात बदल झाला असला तरी अपेक्षित गतीने विस्तार झालेला नाही. आता पुढील दोन दशके भारताच्या ऊर्जा धोरणासाठी निर्णायक असतील. भारताने योग्य वेळी योग्य गुंतवणूक आणि धोरणात्मक निर्णय घेतले, तर अणुऊर्जा क्षेत्र देशाच्या हरित विकासाचा मजबूत पाया बनू शकते. अन्यथा, शंभर गीगावॅटचे लक्ष्य केवळ कागदावरचे स्वप्न ठरण्याची भीती नाकारता येणार नाही.

अर्थनगरीतील दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे केंद्र सरकारने ३० सप्टेंबरपर्यंत साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. देशांतर्गत बाजारात साखरेचा पुरवठा वाढवून दर नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशाने सरकारने हा निर्णय घेतला असला, तरी साखर उद्योगातील तज्ज्ञांनी अचानक घेतलेल्या या निर्णयावर तीव्र टीका केली आहे. या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारात साखरेचे दर मोठ्या प्रमाणात घसरतील, साखर कारखान्यांवरील कर्जाचा भार वाढेल आणि त्याचा थेट फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसेल. देशांतर्गत बाजारात साखरेचे दर आधीच घसरू लागले आहेत. अचानक लागू करण्यात आलेल्या निर्यातबंदीमुळे जागतिक बाजारपेठेत भारतीय साखर उद्योगाची प्रतिमा खराब होईल. भारतातून मुख्यतः श्रीलंका, बांगला देश, अफगाणिस्तान, नेपाळ आणि अरब देशांना साखरेची निर्यात केली जाते. या बंदीमुळे या देशांबरोबर आधीच व्यवहार निश्चित केलेल्या व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निर्यात थांबल्यामुळे साखर कारखान्यांच्या रोख प्रवाहावर परिणाम होईल आणि शेतकऱ्यांना द्यावयाच्या 'एफआरपी' अर्थात 'फेअर अँड रेम्युनरेटिव्ह प्राइस'च्या देयकांमध्ये मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. केवळ महाराष्ट्रातील साखर कारखान्यांवर एफआरपीची सुमारे १,५५० कोटी रुपये थकबाकी आहे, तर देशभरात ही थकबाकी जवळपास बारा हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. अशा परिस्थितीत कारखान्यांना शेतकऱ्यांचे पैसे वेळेवर देणे अत्यंत कठीण होणार आहे. ऊस लागवडीचे क्षेत्र कमी होणार नसले, तरी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनातून अपेक्षित नफा मिळणे कठीण होईल. सरकारने साखरआधारित इथेनॉल खरेदी वाढवावी, अशी मागणी साखर उद्योगातून केली जात आहे. सध्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण केले जाते, ते वाढवून ३० टक्के करावे, त्यामुळे साखर कारखान्यांना आर्थिक आधार मिळू शकेल, अशी मागणीही जोर धरत आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. लंडनमध्ये आज इंग्रजांइतक्याच प्रमाणात भारतीयांचीही मालमत्ता दिसून येत आहेत. मेफेअर आणि मेरीलेबोनसारख्या उच्चभ्रू भागांपासून लंडनच्या बाहेरील परिसरांपर्यंत भारतीयांचा प्रभाव वाढला आहे. चांगल्या शाळा, मोकळी जागा आणि परवडणारे बजेट लक्षात घेऊन भारतीय आता नॉर्थ लंडनमधील हॅरो, साउथ लंडनमधील क्रॉयडन आणि वेस्ट लंडनमधील हाउंसलोपर्यंत मोठ्या प्रमाणात स्थायिक होत आहेत. भारतीयांची लंडनमधील वाढती गुंतवणूक ही केवळ आर्थिक कारणांमुळे नाही, तर त्याला सांस्कृतिक मानसिकताही मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे. ज्या देशाने कधी काळी भारतावर राज्य केले, त्या देशात मालमत्ता असणे हे आज स्थैर्य, प्रतिष्ठा आणि यशाचे प्रतीक मानले जाते. मुलांचे शिक्षण, व्यावसायिक संबंध, सुरक्षित परतावा आणि पुढील पिढ्यांसाठी संपत्ती निर्माण करण्याची भारतीय परंपरा ही यामागील मुख्य कारणे मानली जातात. बहुतेक भारतीय गुंतवणूकदार तीन ते पाच कोटी रुपयांच्या बजेटमध्ये गुंतवणूक करत असून, एक ते तीन बेडरूमचे फ्लॅट सर्वाधिक लोकप्रिय आहेत; मात्र हा कल केवळ घरांपुरता मर्यादित नाही. नव्याने परदेशात स्थायिक होणारे काही लोक गुंतवणूक करत आहेत, तर काही श्रीमंत भारतीय लंडनमधील ऐतिहासिक आणि अतिमहागड्या मालमत्ता विकत घेत आहेत. आता भारतीय गुंतवणूकदार हॉटेल्स, वृद्धाश्रम, स्टुडंट हाउसिंग आणि व्यावसायिक प्रकल्पांमध्येही मोठ्या प्रमाणात पैसा गुंतवत आहेत; जेणेकरून दीर्घकालीन उत्पन्न मिळू शकेल. भारतीय गुंतवणूकदार केवळ दिखाव्यासाठी मालमत्ता घेत नाहीत. त्यांचा भर भाडे उत्पन्न आणि भविष्यातील किंमतवाढ यावर असतो. एका स्थानिक एजंटच्या मते, भारतीय गुंतवणूकदार पिढ्यानपिढ्यांचा विचार करून गुंतवणूक करतात. त्यामुळे ते अल्पकालीन नफ्यापेक्षा उद्यानांच्या जवळची घरे किंवा पेंटहाउससारख्या मालमत्तांना पसंती देतात. लंडन भारतीयांसाठी आकर्षक ठरण्याचे आणखी एक मोठे कारण म्हणजे ते शिक्षण आणि व्यवसायाचे जागतिक केंद्र मानले जाते. येथील इंग्रजी भाषा आणि कायदेशीर व्यवस्था भारतीयांसाठी परिचित आहे. ब्रिटिश सत्ताकाळामुळे भारतीयांना ब्रिटिश इंग्रजी आणि तेथील प्रणालीशी जवळीक वाटते. महागाई आणि वाढत्या खर्चामुळे तरुणांसाठी घर खरेदी करणे काहीसे कठीण झाले असले तरी लंडनमध्ये घर असावे, हे स्वप्न आजही अनेक भारतीय मोठ्या उत्साहाने पाहत आहेत.

---

**चर्चा आजची**

# स्वप्नांच्या खांद्यावर नैराश्याचे ओझे



**वैष्णवी वाडकर**

जून महिना उजाडला की, चाहूल लागते ती शाळा सुरु होण्याची. नवीन वर्ग, नवीन पुस्तके, नवा गणवेश, नवे मित्र अशा अनेक आशा घेऊन विद्यार्थी एका नव्या शिक्षण वर्षात प्रवेश करतात. एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जात असताना विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक जबाबदारीदेखील वाढते. मात्र शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचं मन मित्र-मैत्रिणींमध्ये रमत असल्याने त्याचा ताण त्यांच्यावर जास्ती येत नाही. मित्र-मैत्रिणींच्या मदतीने अनेक प्रश्न सहज सोडवले जातात. शाळा-महाविद्यालयात अभ्यास आणि परीक्षा एवढ्यापुरताच काय तो ताण मर्यादित असतो. आयुष्याची खरी परीक्षा पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सुरु होते. आणि सद्यस्थिती बघता देशातील शिक्षण क्षेत्रासह नोकरीमध्येदेखील स्पर्धा वाढली आहे. या वाढत्या स्पर्धेमध्ये स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी लाखो तरुण झटत आहेत. मात्र स्पर्धा परीक्षा, पेपरफुटीच्या घटना, वाढती बेरोजगारी आणि भविष्याबाबतची अनिश्चितता यामुळे अनेकांच्या स्वप्नांच्या खांद्यावर नैराश्याचे ओझे वाढताना दिसत आहे, अशी चर्चा आहे. आज लाखो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी रात्रंदिवस मेहनत करत आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी, बँकिंग, रेल्वे, पोलीस भरती, अशा विविध क्षेत्रांमध्ये करिअर घडवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांचे प्रमाण अधिक आहे. त्यासाठी अनेक विद्यार्थी घरापासून लांब राहून अभ्यास करतात, महागड्या क्लासेसची फी भरतात आणि आयुष्यातील महत्त्वाची वर्षे एका परीक्षेसाठी देतात. मात्र, अलीकडील नीट आणि एसएससी जीडी पेपरफुटीच्या घटनांनी विद्यार्थ्यांच्या विश्वासालाच तडा गेला आहे. वर्षानुवर्षे केलेल्या अभ्यासानंतर जर प्रश्नपत्रिकाच फुटत असेल तर एवढी मेहनत का करावी, असा प्रश्न अनेक विद्यार्थ्यांना पडू लागला आहे. एका परीक्षेसाठी दोन ते तीन वर्षे तयारी करणारा विद्यार्थी आणि दुसरीकडे पेपरफुटीच्या घटना यामुळे प्रामाणिकपणे व सातत्याने मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास उडत चालला आहे. प्रश्न फक्त पेपरफुटीचा नाही तर प्रश्न आहे त्या लाखो विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा जे प्रामाणिकपणे मेहनत घेत आहेत. अनेकदा परीक्षा झाल्यानंतर निकालासाठी महिनोनमहिने वाट पाहावी लागते. काही भरती प्रक्रिया काही कारणास्तव अडकतात काही रद्द होतात, तर काहींमध्ये अनियमिततेच्या तक्रारी समोर येतात. याचा परिणाम तरुणांवर होत त्यांच्या वयाची महत्त्वाची वर्षे वाट पाहण्यात निघून जातात. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करूनही नोकरीची निश्चितता नसल्याने अनेक तरुण सततच्या असुरक्षिततेत जगत आहेत. भरती प्रक्रिया रखडणे, निकालांना होणारा विलंब, मर्यादित रोजगार संधी आणि वाढती स्पर्धा यामुळे भविष्य अधिकच अंधूक होत चालले आहे. शिक्षण पूर्ण करूनही रोजगाराची खात्री नसल्याने अनेक तरुण नैराश्य, चिंता आणि मानसिक तणावाचा सामना करत आहेत. त्यातच समाज आणि कुटुंबाकडून अपेक्षांचे ओझेही वाढत जाते. 'नोकरी कधी लागणार?', 'अजून किती परीक्षा देणार?' अशा प्रश्नांना सामोरे जाताना अनेक तरुण मानसिक दबावाखाली जात आहेत. अपयशाची भीती, आर्थिक अडचणी आणि व्यवस्थेवरील कमी होत जाणारा विश्वास यामुळे अनेक युवक नैराश्याच्या गर्तेत ढकलले जात आहेत. देशातील तरुण हा देशाचे उज्ज्वल भविष्य मानला जातो. मात्र, आज अनेक गुणवंत आणि आशावादी तरुण रोजगाराच्या शोधात भटकताना दिसतात. शिक्षण, मेहनत, गुणवत्ता आणि कौशल्य असूनही संधींची कमतरता, वाढती स्पर्धा आणि व्यवस्थेतील त्रुटींमुळे त्यांच्या मनातील आशा निराशाचे रूप घेत आहे. पेपरफुटी ही केवळ प्रश्नपत्रिकेची चोरी नसून ती लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची चोरी आहे, अशी प्रतिक्रिया अनेक तरुणांनी दिली आहे. पेपरफुटीमुळे अनेक तरुणांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पूर्ण उडाला आहे. त्यामुळे जेव्हा विश्वासच तुटतो तेव्हा स्वप्नांच्या खांद्यावर नैराश्याचे ओझे आणखी वाढत जाते. नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत असताना लाखो विद्यार्थी पुन्हा नव्या आशा आणि स्वप्ने घेऊन शिक्षणाच्या प्रवासाला लागतील. मात्र त्या स्वप्नांना योग्य दिशा, सामान संधी आणि विश्वासार्ह व्यवस्था मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. अन्यथा विद्यार्थी नव्याने शिक्षणाच्या प्रवासाला सुरुवात करतील, पण त्यांच्या स्वप्नांच्या खांद्यावरील नैराश्याचे ओझे मात्र दिवसेंदिवस वाढतच जाईल.

---

**लोकसंसद**

## कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मंत्रालय स्थापन करणारे केरळम हे देशातील पहिलेच राज्य!

कृत्रिम बुद्धिमत्ता हे सध्याच्या काळातील सर्वात अधिक परिवर्तनशील तंत्रज्ञानापैकी एक असल्यामुळे त्याचा आपल्या दैनंदिन जीवनावर सर्वाधिक प्रभाव पडत आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आता कृषी, आरोग्य, उद्योग, व्यवसाय, शिक्षण, बँकिंग आणि फायनान्स अशा सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अशा प्रकारे सर्वच क्षेत्रांमध्ये वाढणारा कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव लक्षात घेऊन तसेच या तंत्रज्ञानातील माहिती, सखोल तपशील व पारदर्शकता विचारात घेऊन केरळम हे देशातील पहिलेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मंत्रालय स्थापन करणारे राज्य ठरले आहे. केरळमच्या या नवनिर्मित 'एआय' मंत्रालयाचा मुख्य उद्देश सरकारी प्रशासनात पारदर्शकता आणणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लोककल्याणासाठी वापर करणे हा आहे. त्यानुसार आरोग्यसेवा, शिक्षण, कृषी क्षेत्र, उद्योग आणि सार्वजनिक सेवांमध्ये 'एआय'चा वापर करून कामकाज अधिक गतिमान करणे, तंत्रज्ञान आधारित स्टार्टअप्स आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे, रोजगार निर्मितीसाठी तरुणांना एआय आणि डिजिटल कौशल्यांचे प्रशिक्षण देणे इत्यादी गोष्टींवर भर दिला जाणार आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वी केरळमच्याच तिरुवनंतपुरम येथील एका शाळेने 'आयरीस' नावाचा भारतातील पहिला आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) शिक्षक रोबोट सादर करून शिक्षण क्षेत्रात एक क्रांतीकारी पाऊल उचलले होते.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**दिनविशेष**

# लालपरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा!



महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७८ वा वाढदिवस आहे. १ जून १९४८ रोजी पुणे - नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यनुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावात आज एसटी पोहचली आहे. एकूण ३१ विभागातून एसटीचे कामकाज केले जाते त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे. राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत. लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात आहे त्यामुळे महामंडळाने नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलेली नाही. कंत्राटी पदे भरून एसटीचे खाजगीकरण करण्याचा अट्टाहास केला जात आहे त्यामुळे कर्मचारी आणि महामंडळ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे या वादात प्रवाशी मात्र भरडले जात आहेत म्हणूनच सरकारने एसटीच्या खाजगिकरणाचा अट्टाहास सोडून एसटीला सशक्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी कर्मचारी नेमून त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आणि सुविधा दिल्यास महामंडळाला पुन्हा सुगीचे दिवस येतील. प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आपुलकीची आणि आदराची भावना आहे. राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या तसेच गोरगरीब आणि वंचित मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे, यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. एसटीने लाल परीपासून सुरू केलेला प्रवास, हिरकणी, शिवनेरी, शिवशाही ते विठाई असा पुढे चालला आहे. सरकारनेही एसटी कडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७८ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!


**– श्याम ठाणेदार**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### १ जून

१) श्री.मुकुटराव रामचंद्र भोसले मु.विद्यानगर, अलिबाग दि.१-६-१९४१
२) श्री.लिलाधर नथू कोल्हे श्रीबाग-२ अलिबाग दि.१-६-१९४७
३)श्रीम.विजया विद्याधर चौधरी अलिबाग दि.१-६-१९४७
४)श्री.चिंतामण नथुराम म्हात्रे चेंढरे-अलिबाग, दि.१-६-१९४८
५)श्री. देवराम रामा म्हात्रे रामनाथ, अलिबाग दि.१-६-१९४४
६)श्री.सुरेश विठ्ठल मापुस्कर वरसोली, अलिबाग दि.१-६-१९४२
७)श्रीम.मंगला सुरेश मयेकर मु.किहीम, अलिबाग दि.१-६-१९४९
८)श्री.प्रमोद भास्कर गुरव चेंढरे, अलिबाग दि.१-६-१९५०
९)श्री.पांडुरंग शिवराम पाटील नागडोंगरी, अलिबाग दि.१-६-१९५०
१०)श्री.रामचंद्र शंकर लोकरे विद्यानगर, अलिबाग दि.१-६-१९५०
११)श्री.चंद्रकांत गोविंद पाटील मु.आक्षी, अलिबाग दि.१-६-१९५०
१२)श्री.काशिनाथ गोविंद थळे मु.खंडाळा, अलिबाग दि.१-६-१९५०
१३)श्री.मनोहर मोरेश्वर पाटील मु.नवेदर-नवगाव, अलिबाग दि.१-६-१९४७
१४)श्रीम.विद्या दामोदर पाटील पिंपळभाट, अलिबाग दि.१-६-१९४९
१५) श्री.तुकाराम ताथू सोनावणे नव-अलिबाग, दि.१-६-१९५१
१६)श्री.दुर्वास वाळकू खांडपेकर विद्यानगर, अलिबाग दि.१-६-१९४९
१७)श्री.यशवंत सखाराम पाटील मु.मुळे, अलिबाग दि.१-६-१९५०
१८)श्री.हिराचंद्र अंबाजी पिंगळे अलिबाग, दि.१-६-१९४६
१९)श्रीम.सुजाता गुरूनाथ वार्डे श्रीबाग-२,अलिबाग दि.१-६-१९४९
२०)श्री.सुरेश महादेव गुरव अलिबाग, दि.१-६-१९५२
२१)श्री.वासुदेव अंबाजी शेडगे जाधवनगर, अलिबाग दि.१-६-१९५२
२२)श्रीम.मेघा मोहन पाटील शिवाजीनगर, अलिबाग दि.१-६-१९५१
२३)श्री.रामदास गोविंद थळे मु.आंबेपूर, अलिबाग दि.१-६-१९५२
२४)श्रीम.कुसुम जनार्धन पाटील अलिबाग दि.१-६-१९४३
२५)श्री.हरिश्चंद्र भिवा पडवळ वरसोली, अलिबाग दि.१-६-१९५२
२६)श्रीम.साखरबेन चंद्रकांत गडा विद्यानगर, अलिबाग दि.१-६-१९४६
२७)श्री.हिरालाल वीरजी जैन अलिबाग दि.१-६-१९४७
२८)श्री.सुधाकर मधुकर जंगले अलिबाग, दि.१-६-१९४९
२९)श्री.अमर रामचंद्र म्हात्रे पंतनगर, अलिबाग दि.१-६-१९४४
३०)श्री.राजाराम बालकृष्ण पाटील मु.कुरूळ, अलिबाग दि.१-६-१९५३
३१)श्री.जगदीश शांताराम थळे गोंधळपाडा अलिबाग दि.१-६-१९४९
३२)श्री.सुरेश रामभाऊ ठाकरे वरसोली, अलिबाग दि.१-६-१९५४
३३)श्री.विढोबा सदाशिव पाटील मु.कुरूळ, अलिबाग दि.१-६-१९५४
३४)श्री.विश्वास चंदू फडतरे विद्यानगर, अलिबाग दि.१-६-१९५०
३५)श्री.विष्णू निळकंठ बापट चेंढरे-अलिबाग दि.१-६-१९५४
३६)श्री.परशुराम विठ्ठल माळी श्रीबाग-३, अलिबाग दि.१-६-१९५४
३७)श्रीम.सुनिता शंकर सुतार श्रीबाग-२, अलिबाग दि.१-६-१९५१
३८)श्री.शरयू शशिकांत पाटील विद्यानगर, अलिबाग दि.१-६-१९५५
३९)श्री.मनोहर पोसू पाटील मु.कुरूळ, अलिबाग दि.१-६-१९५५
४०)श्री.प्रभाकर गणपत गोळे मु.वेश्वी, अलिबाग दि.१-६-१९५४
४१)श्री.सुधाकर मुकुंद पाटील मु.कुरूळ, अलिबाग दि.१-६-१९५४
४२)श्री.परशुराम दत्तात्रेय म्हात्रे मु.धोकवडे,अलिबाग दि.१-६-१९५४
४३)श्री.विलास जानू तांडेल कोळीवाडा,अलिबाग दि.१-६-१९५६
४४)श्रीम.रेखा मनोहर खराडे, मु.खंडाळे, अलिबाग दि.१-६-१९५६
४५)श्रीम.कस्तुरी मल्लीकार्जुन जकापुरे अलिबाग, दि.१-६-१९५२
४६)श्री.जयपाल परशुराम पाटील चेंढरे-अलिबाग, दि.१-६-१९५६
४७)श्री.रामचंद्र सोम्या साखरकर अलिबाग, दि.१-६-१९५६
४८)श्री.हरिश्चंद्र मुरलीधर पाटील पिंपळभाट, अलिबाग दि.१-६-१९५४
४९)श्री.हरिश्चंद्र सखाराम नाईक चेंढरे-अलिबाग दि.१-६-१९५४
५०)श्री.सुनील पोपटराव पाटील श्रीबाग-२,अलिबाग दि.१-६-१९५७
५१)श्री.बामा हाशा जैतू मु.नवेदर, अलिबाग, दि.१-६-१९५१
५२)श्री.ज्ञानेश्वर जानू नवगावकर मु.मेटपाडा,अलिबाग दि.१-६-१९५७
५३)श्री.वामन कृष्णा म्हात्रे पिंपळभाट, अलिबाग दि.१-६-१९५७
५४)श्री.अनंत सखाराम मुलुस्कर मु.वेश्वी, अलिबाग दि.१-६-१९५६
५५)श्री.लक्ष्मण गजानन कावळे मु.नवेदर, अलिबाग दि.१-६-१९५६
५६)श्री.नागनाथ शंकर जैतू मु.नवेदर, अलिबाग दि.१-६-१९५६
५७)श्री.विनायक हरिश्चंद्र चव्हाण मु.तुडाळ, अलिबाग दि.१-६-१९५७
५८)श्री.दत्तात्र्येय बाबू आढाव मु.अलिबाग-शास्त्री दि.१-६-१९४२
५९)श्री.गोकुळ दशरथ कोळी मु.नवेदर, अलिबाग दि.१-६-१९५३
६०)श्री.पोषणा इलंणा बेजंकल अलिबाग दि.१-६-१९५४
६१)श्री.यशवंत तुकाराम घरत अलिबाग दि.१-६-१९५८
६२)श्री.कैलास मारूती पिंगळे मु.विद्यानगर, अलिबाग दि.१-६-१९५१
६३)श्रीम.किशोरी केसरीनाथ चिंबुलकर मु.सातिर्जे,अलिबाग दि.१-६-१९५५
६४)श्री.मनोहर गणपत पाटील मु.तळवली,अलिबाग दि.१-६-१९५७
६५)श्रीम.अरूणा अरविंद कालवणकर मु.किहीम,अलिबाग दि.१-६-१९५८
६६)श्री.चंद्रकांत जनार्दन पाटील चेंढरे,अलिबाग दि.१-६-१९४८
६७)श्रीम.सुनंदा चंद्रकांत पाटील चेंढरे-अलिबाग, दि.१-६-१९५३
६८)श्रीम.गीता दिनानाथ जुईकर मु.पांडवादेवी, अलिबाग दि.१-६-१९५५
६९)श्री.केदार राघा रोगे मु.नवेदर, अलिबाग दि.१-६-१९५८
७०)श्री.प्रभाकर शंकर शिंदे वरसोली,अलिबाग दि.१-६-१९५३
७१)श्री.नंदकुमार कानू घरत मु.वरसोली,अलिबाग दि.१-६-१९५८
७२)श्री.किशोर जनार्दन विरकुड थळ, अलिबाग दि.१-६-१९५७
७३)श्री.बादशाहा शंकर भांगरे वेश्वी, अलिबाग दि.१-६-१९५९
७४)श्री.गजानन हरिश्चंद्र कोळी मु.नवगाव,अलिबाग दि.१-६-१९५०
७५)श्री.चंद्रकांत नामदेव शिंदे अलिबाग दि.१-६-१९४८६०
७६)श्री.राजन गोपीनाथ कुलकर्णी चेंढरे, अलिबाग दि.१-६-१९६१
७७)श्रीम.सुनंदा नारायण चव्हाण श्रीबाग-२,अलिबाग दि.१-६-१९५३
७८)श्री मेघनाथ गोपाळ मुंडे आक्षी,अलिबाग दि.१-६-१९५०
७९)श्री.वसंत यशवंत पाटील मु.परहूर-पाडा, अलिबाग दि.१-६-१९५३
८०)श्री.अजित चिंतामण पाटील मु.बोरिस, अलिबाग दि.१-६-१९६३
८१)श्री.शरद नथू पाटील मु.कुरूळ, अलिबाग दि.१-६-१९५९
८२) श्री.विजय जयवंत घरत मु.दिघोडी,अलिबाग दि.१-६-१९५९
८३)श्रीम.जयश्री गजानन पोपट चेंढरे,अलिबाग दि.१-६-१९६०
८४)श्री.कैलास रामभाऊ वरसोलकर अलिबाग दि.१-६-१९५८
८५)श्री मदन गजानन वैद्य खंडाळे, अलिबाग दि.१-६-१९५७
८६)श्री.तानागी बंकट भोसले चेंढरे,अलिबाग दि.१-६-१९६०
८७) पुष्पा कांतीलाल जैन अलिबाग, दि. १-६-१९५४
८८) कांचन चंपालाल जैन अलिबाग, दि. १-६-१९५६
८९) भिमराव पिराजी आवळे अलिबाग, दि. १-६-१९५०
९०) वैशाली विलास गंभीर अलिबाग, दि. १-६-१९५०
९१) श्रीम. राधाबाई चिंतामण पयर अलिबाग, दि. १-६-१९६०
९२) श्री. गजानन शंकर रामनाथकर अलिबाग, दि. १-६-१९६४

# गणवेशासाठी पॉलिस्टर कापडावर बंदी



**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील शासकीय आणि जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या कोट्यवधी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मोफत गणवेशाच्या दर्जाबाबत आता कोणतीही तडजोड केली जाणार नाही. गणवेशासाठी शंभर टक्के पालिस्टर कापड वापरण्यास शासनाने पूर्णपणे बंदी घातली असून, विद्यार्थ्यांच्या शरीराला वा त्वचेला इजा न पोहचवणारे किमान ७०:३० किंवा ८०:२० प्रमाणात पॉलिस्टरसह कॉटन किंवा व्हिस्कोस मिश्रित दर्जाचे कापड वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**महिला बचत गटांना प्राधान्य**

नव्या सुधारणेनुसार, पात्र विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी गणवेश वाटप करणे बंधनकारक असेल. हे गणवेश स्थानिक महिला बचत गटांमार्फत शिवून घेतले जावेत, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. ज्या भागात स्थानिक बचत गट उपलब्ध नसतील, तिथे आजूबाजूच्या

- **कापडाचा दर्जा तपासणार**
- **बचत गटांना शिलाईचे काम**

क्षेत्रातील बचत गटांशी संपर्क साधण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला देण्यात आले आहेत. बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी बचत गटांना शाळांशी जोडण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही निर्देश आहेत. गणवेशाची गुणवत्ता राखण्यासाठी त्रिस्तरीय तपासणी सक्तीची कारण्यात आली आहे. केंद्रप्रमुख १०० टक्के शाळांची तपासणी करतील. गट शिक्षणाधिकारी तालुक्यातील किमान ३० टक्के शाळांची तपासणी करतील आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) प्रत्येक तालुक्यातील किमान १० शाळांना प्रत्यक्ष भेट देतील. याशिवाय प्रत्येक तालुक्यातून यादृच्छिक पद्धतीने किमान एका शाळेतील कापडाचा नमुना घेऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवला जाईल. कापड निकृष्ट दर्जाचे आढळल्यास पुरवठादार आणि शाळा व्यवस्थापन समितीवर थेट कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा शासनाने दिला आहे. तसेच राज्यस्तरीय तपासणी पथकेही अचानक भेटी देऊन नमुने गोळा करणार आहेत.

स्काऊट गाईडसाठी स्वतंत्र गणवेश विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या गणवेशापैकी एक गणवेश प्राधान्यक्रमाने 'स्काऊट आणि गाईड' विषयाला अनुरुप असेल. यासाठी मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळी हाफ पॅन्ट, तर मुलींसाठी आकाशी शर्ट आणि गडद निळा स्कर्ट असलेला पिनो फ्रॉक (किंवा सलवार-कमीज असलेल्या शाळांमध्ये गडद निळी सलवार आणि आकाशी कमीज) अशी रचना निश्चित करण्यात आली आहे.

केंद्र सरकारच्या समग्र शिक्षा आणि राज्य सरकारच्या निधीतून या योजनेला अनुदान दिले जाते. मात्र विद्यार्थ्यांना आणखी दर्जेदार गणवेश मिळावेत, यासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांनी स्वत:चे योगदान द्यावे किंवा सीएसआरच्या माध्यमातून वाढीव निधी गोळा करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन शासनाने केले आहे.

## शारदा साबळे यांचे निधन

**खांब :** धानकान्हे गावच्या शारदा विठोबा साबळे यांचे बुधवारी (दि.२७) वयाच्या सुमारे ८३ व्या वर्षी राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल साबळे परिवारासह समस्त धानकान्हे गावातून शोक व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, जावई, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी शुक्रवारी (दि.५) तर अंतिम धार्मिकविधी सोमवारी (दि.८) निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# रानसई धरणाची पाणीपातळी खालावली

**। उरण । प्रतिनिधी ।**

वाढत्या तापमानामुळे रानसई धरणातील पाणीसाठा कमी होत आहे. त्यामुळे धरणातून जूनअखेरपर्यंत पुरवठा करण्याचे नियोजन एमआयडीसीने केले आहे. रानसई धरणाची पाणीपा-तळी शुक्रवारी ८६ फुटांवर होती. तर गेल्या वर्षी याच दिवशी ही पातळी ९६ फूट इतकी होती. मात्र, त्या वेळी मे महिन्यात पावसाने सुरुवात केली होती. मात्र, या वर्षी पाणीपातळी अधिक घटल्याने उरणकरांना पावसाची प्रतीक्षा आहे.

रानसई धरणातील पाणी साठवण क्षमता गेली अनेक वर्षे वाढत नसल्याने उरणच्या नागरिकांवर पाणीकपातीचे संकट वाढू लागले आहे. धरणाची पाणी साठवण क्षमता कमी झाल्याने या धरणातून पावसाळ्यातील साडेतीन महिन्यांचे लाखो लिटर पाणी वाया जाते. त्यामुळे येथील नागरिकांना ऑक्टोबर ८२११; नोव्हेंबर महिन्यापासूनच पाणीकपातीचा सामना करावा लागतो. धरणाची पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी एमआयडीसीने तयार केलेला प्रस्ताव अनेक वर्षे धूळ खात आहे.

गेल्या ६० वर्षांत पाण्याची मागणी वाढली असली तरी रानसई धरणातील पाणीसाठा कमी होत गेला. धरणाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी धरणाची उंची वाढवावी, गाळ काढावा, अशी मागणी वारंवार करण्यात येत आहे.

> **रानसई धरणातील पाणीसाठा ८६ फुटांवर आला आहे. नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी या पाण्याचे नियोजन केले जात आहे. त्यानुसार ३० जूनपर्यंत पाणीपुरवठा करता येणार आहे. मात्र या कालावधीत नागरिकांनी सहकार्य करून पाणी जपून वापरावे.**
>
> **– ग्यानदेव सोनवणे, उपअभियंता, एमआयडीसी, उरण**

# नेरळमध्ये आध्यात्मिक बालसंस्कार शिबीर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ येथे श्री संत ज्ञानोबा तुकोबा वारकरी शिक्षण संस्था यांच्या वतीने बालसंस्कार शिबिराचे आयोजन केले आहे. १७ व्या वर्षी हे आयोजन करण्यात आले आहे. आध्यात्मिक बाल सुसंस्कार शिबिराला ३० तरुण वारकरी शिक्षण घेत आहेत. दरम्यान या १५ दिवसीय निवासी बालसंस्कार शिबिराचे निमित्ताने नेरळ येथे रंगतोय भव्य कीर्तन महोत्सव आयोजित केला आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ येथे श्री संत ज्ञानोबा तुकोबा वारकरी शिक्षण संस्था यांच्या वतीने आयोजित १६ वा भव्य कीर्तन महोत्सव सोहळा आणि अध्यात्मिक बाल सुसंस्कार शिबीर सध्या मोठ्या उत्साहात सुरू आहे. १५ मे पासून आध्यात्मिक बालसंस्कार शिबिर सुरू झाले असून याच शिबिरात २५ मे पासून सात दिवसांचे कीर्तन महोत्सव रंगले होते. एक जून रोजी काल्याचे कीर्तन होऊन आध्यात्मिक शिबिराची सांगता होणार आहे. मअध्यात्मिक बाल सुसंस्कार शिबीरफ जोमाने सुरू आहे. या शिबिरामध्ये सध्या ३० मुले वारकरी संप्रदायाचे व पारमार्थिक ज्ञान आत्मसात करत आहेत. यामध्ये मुलांना विविध वाद्ये वाजवणे, शास्त्रशुद्ध गायन आणि अध्यात्मिक संस्कारांचे मोलाचे धडे दिले जात आहेत. नव्या पिढीला संस्कृतीशी जोडणारा हा उपक्रम यंदाच्या महोत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य ठरला आहे. गेली १६ वर्षे ही शिबीर अखंडितपणे सुरू असून आध्यात्मिक शिबिरात निवासी शिक्षण घेण्याची परंपरा कायम आहे.

या महोत्सवांतर्गत पहाटे काकडा आरती पासून होणारी सुरुवात नंतर मृदुंग वाजवणे, टाळ वाजवणे, प्रवचन करणे, कीर्तनाचे महत्व,गोडी आणि भजनाचे महत्व कला याबाबत मार्गदर्शन केले जाते. दसायंकाळ शिबिरातील सर्व लहान मुले व वारकरी मंडळाचा हरिपाठ होतो. त्यानंतर रात्री ९ वाजेपर्यंत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने तसेच विविध भजनी मंडळांचे जागरभजन होत आहेत. ३१ मे रोजी दुपारी ४ वाजता भव्य दिंडी सोहळा आयोजीत करण्यात आला होता.

## महामार्गावर झाडांची कागदावरच लागवड

**रत्नागिरी :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणात १ लाख १५ हजार ६१६ झाडांची कत्तल झाली होती. पर्यावरण ऱ्हासावरून निर्माण झालेल्या तीव्र जनक्षोभानंतर अखेर राष्ट्रीय महामार्ग विभागाने अधिकृत खुलासा केला आहे. परशुराम ते झाराप दरम्यान करण्यात आलेल्या १ लाख ९६ हजार ११२ झाडांच्या लागवडीचा लेखाजोखा कार्यकारी अभियंत्यांनी जाहीर केला आहे. सध्या सुकलेल्या व मृत झाडांच्या जागी आगामी पावसाळ्याच्या मध्यापर्यंत नवीन झाडे लावण्याचे आश्वासन दिले आहे.

# पर्यटनासाठी पर्यटकांची माथेरानला पसंती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरान मध्ये सध्या पर्यटन हंगाम फुलला आहे. वातावरणात प्रचंड उष्मा असल्याने थंड हवेचे ठिकाणाला सर्व प्राधान्य देत असतात. त्यामुळे सध्या माथेरान पर्यटकांनी गजबजलेले असून व्यावसायिक आनंदी आहेत. १५ जून पर्यंत पर्यटन हंगाम असाच चालावा अशी अपेक्षा व्यावसायिक करीत आहेत.

- **नगरपरिषदेकडून स्वच्छतेवर भर**

माथेरान या पर्यटन स्थळी पर्यटक हे येथील प्रामुख्याने लाल मातीच्या रस्त्यावरून चालण्यासाठी पर्यटक येत असतात. माथेरानमध्ये व्यापार उदीम वाढला असून पर्यटकांच्या रेलचेल मधून व्यवसाय वाढला असल्याने पॉईंटवर व्यवसाय करणारे माथेरानमधील स्टॉल धारक खुश आहेत. मे आणि अर्धा जून महिना पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा समजला जातो. माथेरान या जंगलाने वेढलेल्या पर्यटन स्थळी पर्यटक गर्दी करतात. त्यामुळे व्यापार उदीम वाढला आहे.माथेरान सारख्या मुंबईपासून जवळ असलेल्या पर्यटन स्थळी येणे वाहतुकीच्या मुबलक साधनांमुळे सहज शक्य आहे.दुसरीकडे शहरात वाहतुकीसाठी पर्यावरण पुरक ई- रिक्षा उपलब्ध असल्याने पर्यटकांना शहरात जाण्यासाठी चालायला लागत नाही. त्यात ई- रिक्षामुळे वृद्ध आणि महिला पर्यटक यांच्यासाठी हे पर्यटन स्थळ हाकेचे अंतरावर आले आहे. सध्या कडक उन्हामुळे माथेरान मध्ये पर्यटकांचे लोंढे वाढले आहेत. माथेरानमध्ये सर्वत्र पर्यटकांची गर्दी दिसून येत असून माथेरान मधील हा पर्यटन हंगाम वर्षातील सर्वत मोठा पर्यटन हंगाम समजला जातो. त्यामुळे माथेरान मधील सर्व प्रेक्षणीय स्थळावर पर्यटक ठराविक वेळी गर्दी करून असतात.

माथेरानमधून दिसणारे सूर्योदय आणि सूर्यास्त पाहण्यासाठी पर्यटक येत असतात. माथेरान मधील अशी स्थळे सध्या उन्हाळी पर्यटनासाठी गजबजलेली आहेत. दरम्यान, माथेरानमध्ये सनसेट पॉईंट, लुईझा पॉईंट आदी ठिकाणी पर्यटक मावळत्याचे सूर्याचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केलेली दिसून येत आहे. माथेरानच्या डोंगरावरून डिसणारा सकाळचा सूर्योदय पाहण्यासाठी प्रामुख्याने पॅनोरमा पॉईंट येथे पहाटेच्या वेळी पर्यटक तेथे जाऊन सूर्याचे दर्शन घेत असतात.

## निवडक

### स्मार्ट मीटर दिलासा की बिलाचा धक्का ?

**तळा :** महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रुबुशन कंपनी लिमिटेड अर्थात महावितरणकडून राज्यभरात स्मार्ट मीटर बसविण्याचे काम वेगाने सुरू आहे. सरकारचा दावा आहे की या योजनेमुळे वीज चोरी रोखली जाईल, अचूक बिलिंग होईल आणि ग्राहकांना स्वतःच्या वीज वापरावर नियंत्रण ठेवता येईल. मात्र अनेक ठिकाणी नागरिकांकडून स्मार्ट मीटरमुळे वीज बिलात प्रचंड वाढ झाली अशी तक्रार होत असून सामाजिक आणि राजकीय वातावरण तापू लागले आहे.स्मार्ट मीटर बसवल्यानंतर काही ग्राहकांचे बिल पूर्वीपेक्षा दुप्पट किंवा तिप्पट आल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत अनेक नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. पूर्वी ७०० ते ८०० रुपये येणारे बिल आता २००० ते ३००० रुपयांपर्यंत गेले, असा आरोप ग्राहक करीत आहेत. स्मार्ट मीटरमध्ये प्रीपेड पद्धत, रिअल-टाइम रीडिंग आणि ऑटोमॅटिक डेटा ट्रान्सफर यंत्रणा असल्याने पारंपरिक मीटरपेक्षा बिलिंग अधिक काटेकोर होत असल्याचे महावितरण सांगते. परंतु सामान्य ग्राहकांच्या मते, अचानक वाढलेला खर्च त्यांच्या आर्थिक कुवतीबाहेर जात आहे.महागाई, बेरोजगारी आणि वाढत्या घरगुती खर्चाच्या काळात वीज बिल हा मोठा प्रश्न बनला आहे. सामान्य जनतेच्या विशेषतः शेतकरी, लघु व्यापारी मध्यमवर्गीय कुटुंबे व ग्रामीण भागातील नागरिक यांना वाढीव बिलाचा मोठा फटका बसत असल्याचे चित्र आहे. अनेक कुटुंबांना महिन्याचा घरखर्च आणि वीज बिल यामध्ये तडजोड करावी लागत आहे. काही ठिकाणी नागरिकांनी आंदोलन करत स्मार्ट मीटर हटवा अशी मागणी केली आहे. विरोधी पक्षांनी या मुद्यावर सरकारवर जोरदार हल्लाबोल सुरू केला आहे. स्मार्ट मीटर योजना ही खासगी कंपन्यांना फायदा करून देण्यासाठी आहे. सामान्य ग्राहकांवर आर्थिक भार टाकला जात आहे.

### उपजिविकेवर आधारित कार्यशाळा

**खांब :** नेहमीच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाजाच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या जीवनधारा संस्था कोलाड व सुदर्शन कंपनी रोहा (सीएसआर विभाग ) यांच्या संयुक्त विद्यमाने, कोलाड येथे महिलांसाठी विविध रोजगार उपजिविकेवर आधारित कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न करण्यात आली. या कार्यशाळेत १५ वेगवेगळ्या गावांमधून आलेल्या एकूण ७० महिलांनी सहभाग घेतला. या कार्यक्रम रोहा येथील सुदर्शन कंपनीचे सीएसआर सहा.व्यवस्थापक संग्राम पाटील, वरिष्ठ कार्यकारी अमर चांदणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली; त्यानंतर मान्यवरांचे औपचारिक स्वागत करण्यात आले.संग्राम पाटील आणि अमर चांदणे यांनी महिलांना शिवणकाम काम आणि रोजगाराच्या संधी कशा प्राप्त कराव्यात, याविषयी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. तसेच, महिलांना वर्षभर रोजगार कसा उपलब्ध होईल, याविषयीची माहितीही त्यांनी दिली. अतिशय आनंदी आणि प्रसन्न वातावरणात संपन्न झालेल्या या कार्यशाळेत उपस्थित महिला वर्गाला उपजिविकेच्या दृष्टीने खुप काही शिकायला मिळाल्याने महिला वर्गानी समाधान व्यक्त केले.

### हमीपत्राच्या आधारे अकरावीचा प्रवेश

**रायगड :** राज्य मंडळाने दहावीचा निकाल जाहीर केल्यानंतर अद्याप विद्यार्थ्यांना गुणपत्रकांचे वाटप केलेले नाही. मात्र, अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना दहावीचे गुणपत्रक आणि शाळा सोडल्याच्या दाखल्याची सक्ती न करता हमीपत्राच्या आधारे प्रवेश देण्याच्या सूचना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबतच्या सूचना परिपत्रकाद्वारे विभागीय शिक्षण उपसंचालकांना दिल्या आहेत. सन २०२६-२७ मधील इयत्ता अकरावी प्रवेशाची प्रक्रिया सुरु आहे. २१ मे पासून प्रवेश प्रकियेतील पहिल्या नियमित फेरीला सुरुवात करण्यात आली आहे. या फेरीमध्ये दिनांक २९ मे रोजी प्रवेशासाठीची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. दहावीचा निकाल जाहीर झाला असून अद्याप मूळ गुणपत्रिका विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या नाहीत. या फेरीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना त्यांना मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करायचा आहे, अशा विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला आणि इयत्ता दहावी उत्तीर्ण गुणपत्रक अनिवार्य करण्यात येऊ नये. तसेच इयत्ता दहावी उत्तीर्ण गुणपत्रक आणि शाळा सोडल्याचा दाखला शाळेकडून प्राप्त झाल्यानंतर सादर करण्यात येईल, असे हमीपत्र विद्यार्थ्यांकडून घ्यावे.तसेच हमीपत्राआधारे विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतच्या सूचना कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना देण्यात याव्यात, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### वसई-विरार पोलीस ॲक्शन मोडमध्ये

**वसई :** पुणे येथील पिंपरी चिंचवड व हडपसर येथे विषारी दारूच्या सेवनामुळे १६ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर मिरा भाईंदर- वसई विरार पोलीस आयुक्तालयाने धडक कारवाया सुरू केल्या आहेत. विरार गुन्हे शाखा कक्ष ३ व पेल्हार गुन्हेप्रकटीकरण शाखेच्या पथकाने दुर्गम जंगलांमध्ये सुरू असलेल्या दोन वेगवेगळ्या बेकायदेशीर हातभट्ट्यांवर छापे टाकून पोलिसांनी एकूण १ लाख ६९ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तो नष्ट करण्यात आला आहे.या प्रकरणी दोन महिलांवर दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिली कारवाई ही २९ मे २०२६ रोजी पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत वसई फाट्याजवळील रिचर्ड कंम्पाऊन्ड, मनिचा पाडालगतच्या जंगलात अशीच कारवाई करण्यात आली. सहाय्यक फौजदार शिवाजी पाटील यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे, जंगलातील एका तात्पुरत्या शेडमध्ये चालणाऱ्या हातभट्टीवर छापा टाकण्यात आला. तेथून पोलिसांनी १ लाख ७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. येथीलही साधनसामग्री वाहून नेणे अशक्य असल्याने ती जागेवरच नष्ट करण्यात आली. तर दुसरी कारवाई ही ३० मे २०२६ रोजी विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलींग सुरू असताना, सुनिल पाटील यांना बरफपाडा येथील जंगलात छुप्या पद्धतीने गावठी दारू तयार केली जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे यांना याबाबत माहिती दिल्यानंतर, वरिष्ठांच्या सूचनेनुसार पोलीस पथकाने जंगलात छापा टाकला.



## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५**

**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**




**आजचे अन्नदाते**



**कुसुम जनार्दन पाटील, वाढदिवस अलिबाग**

**कै.विलास आत्माराम पाटील, पुण्यस्मरण, अलिबाग**


# देवगडमध्ये गांजाची लागवड

**। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।**

देवगड तालुक्यातील कोटकामते आडिवरेवाडी येथे आपल्या घरासमोरील कंपाऊंडमध्ये अवैध गांजा पिकाची लागवड केल्याप्रकरणी देवगड पोलिसांनी एका संशयिताला अटक केली आहे. ओंकार कोतेकर (वय ३०) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. ही कारवाई शुक्रवारी, २९ मे रोजी करण्यात आली असून त्याच्याकडून सुमारे ४९ हजार रुपये किमतीची गांजाची झाडे जप्त करण्यात आली आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवैध धंदे व अमली पदार्थांविरोधात कडक कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर यांनी दिले आहेत. त्यानुसार मिळालेल्या माहितीच्या आधारे देवगड पोलिसांनी ही मोठी कारवाई केली. पोलिसांनी छापा टाकून संशयित ओंकार कोतेकर याच्या ताब्यातून सुमारे २ किलो ४५० ग्रॅम वजनाची, ताजी, ओलसर आणि उग्र वासाची गांजाची २३ झाडे जप्त केली आहेत.

**पर्यटकांना डांबून ठेवल्याचा आरोप | दुर्गप्रेमी संघटना आक्रमक**

# गोपाळगड किल्ल्याचा वाद पुन्हा उफाळला

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी जिल्ह्याच्या गुहागर तालुक्यातील ऐतिहासिक गोपाळगड किल्ल्यावर पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना दोन आंबे उचलल्याच्या कारणावरून रोखून धरण्याचा आणि दमदाटी केल्याचा आरोप समोर आल्यानंतर नव्या वादाला तोंड फुटले आहे. या प्रकारांनंतर आता पुन्हा गोपाळ गडाच्या मालकीचा वाद उफाळला आहे. या घटनेशी संबंधित काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर स्थानिक नागरिक, दुर्गप्रेमी आणि शिवप्रेमी संघटनांनी तीव्र संताप व्यक्त केला असून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.



गोपाळगड हा राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आलेला ऐतिहासिक किल्ला असून त्याच्या मालकी हक्काबाबत यापूर्वीही वाद निर्माण झाले होते. शासकीय स्तरावरील त्रुटींमुळे काही काळ या किल्ल्याच्या मालकीसंदर्भात संभ्रम निर्माण झाला होता. येथील मनेर नामक कुटुंबाने या किल्ल्यावर आपला मालकी हक्क व्यक्त केला होता. किल्ल्याची जागा ही खाजगी असून त्यावरिल सात बारा हा मनेर नामक कुटुंबाचा असल्याचा दावा मागील काही वर्षा पुर्वी करण्यात आला होता.

मात्र न्यायालयीन प्रक्रियेनंतर या किल्ल्याला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा कायम राहिला. त्यामुळे हा किल्ला सर्वसामान्य नागरिक, पर्यटक आणि इतिहासप्रेमींसाठी खुला असल्याचे मानले जाते. मात्र आता किल्ल्याच्या मालकी हक्काचा वाद पुन्हा सुरु झाल्याने याचा फटका पर्यटकांना बसू लागला आहे. या किल्ला परिसरात झाडावरून पडलेले दोन आंबे पर्यटकांनी उचलल्याने येथील एका आंबा व्यावसायिकाने पर्यटकां बरोबर हुजत घालून किल्ल्याचा दरवाजा लावून पर्यकांना डांबून ठेवल्याचा प्रकार समोर आला. याबाबत आता संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. अशा परिस्थितीत किल्ल्यावर आलेल्या काही पर्यटकांशी कथित गैरवर्तन झाल्याचा आरोप समोर आल्याने हे प्रकरण पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

# निवडक



## वासांबे ग्रामपंचायतीचे आप्पासाहेबांकडून कौतुक

**रसायनी :** केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयातर्फे जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२६ अंतर्गत 'आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार' गटात देशात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडा यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. तीर्थरूप निरुपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांनी ग्रामपंचायतीच्या सरपंच, सदस्य आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच ग्रामविकास, लोकसहभाग आणि आदर्श प्रशासन यांसंदर्भात मार्गदर्शनही केले. श्री समर्थ संप्रदायाकडून मिळालेल्या या कौतुकामुळे वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या यशात आणखी भर पडली असून ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यावेळी डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांनी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत विविध विकासात्मक विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सरपंच उमा मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव बाळकृष्ण पाटील, माजी सरपंच संदीप मुंढे तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

## पाच जूनला शिवसेनेचा खालापूर तालुका मेळावा

**रसायनी :** बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी महोत्सव २०२६-२७ निमित्त शिवसेना मेळावा व निष्ठावंत व ज्येष्ठ शिवसैनिकांचा सन्मान सोहळा तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांचा सत्कार सोहळा ५ जून रोजी सायंकाळी ५ वाजता खोपोलीतील महाराजा मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला, अशी माहिती शिवसेना खालापूर तालुकाप्रमुख एकनाथ पिंगळे यांनी दिली आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिवसैनिक-युवासैनिक व महिला आघाडीने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. तर या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक शिवसेना नेते आमदार भास्कर जाधव, मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर, शिवसेना उपनेते विजय कदम, उपनेते बबनदादा पाटील, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर, विधानसभा संपर्कप्रमुख ललित शहाणे, उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, महिला संघटिका सुवर्णा जोशी लाभणार आहेत. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आशीर्वादाखाली खालापूर तालुका, खालापूर पंचायत समिती विभाग व खोपोली शहराचा शिवसेना पक्षाचा मेळावा तसेच शिवसेनेच्या चढत्या उतरत्या काळात शिवसेनेवर अढळ श्रद्धा व निष्ठा ठेवून कडवट शिवसैनिक तन-मन-धनाने प्रत्येक आंदोलनात सक्रिय भाग घेत पक्ष संघटना वाढवणाऱ्या निष्ठावंत कडवट श्रेष्ठ शिवसैनिकांचा जाहीर सन्मान सोहळा तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्यांचा सन्मान सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेना खालापूर तालुकाप्रमुख एकनाथ पिंगळे यांच्यासह सर्वच पदाधिकारी व शिवसैनिक युवासैनिक आणि महिला आघाडी मेहनत घेत आहे.



## समाजाभिमुख विचारांमुळे शिवाजी माळी प्रेरणास्थान : दिनकर भुजबळ

**रसायनी :** प्रतिकूल परिस्थितीवर मात करत प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि मेहनतीच्या जोरावर यशस्वी जीवनप्रवास घडविणारे ज्येष्ठ नागरिक तथा माजी प्रशासकीय अधिकारी शिवाजी शंकर माळी हे अनेकांसाठी प्रेरणास्थान असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकार दिनकर भुजबळ यांनी व्यक्त केले. ऑक्ट्रॉय इन्स्पेक्टर म्हणून सेवेला सुरुवात केलेल्या शिवाजी माळी यांनी सिटीबस मॅनेजर, टॅक्स सुपरिटेंडंट आणि ऑफिस सुपरिटेंडंट अशा विविध महत्त्वाच्या पदांवर कार्य करत प्रशासनात आपली वेगळी ओळख निर्माण केली. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी आपल्या मूळ गावी जयराम स्वामींचे वडगाव येथे आधुनिक पद्धतीने शेती व्यवसाय विकसित करण्याचे काम सुरू ठेवले आहे. वाचनाची आवड, संयमी स्वभाव, नेतृत्वगुण आणि समाजाभिमुख विचारांमुळे शिवाजी माळी यांना समाजात विशेष मान आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि सुख-समृद्धी लाभावी, अशा शुभेच्छा विविध स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहेत. संघर्षातून घडलेला त्यांचा कर्तृत्ववान प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे, असेही दिनकर भुजबळ यांनी सांगितले.

## कार्याध्यक्षपदी ॲड. विजय खारकर

**रसायनी :** भारताचे माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांनी स्थापन केलेल्या जनता दल सेक्युलर पक्षाच्या रायगड जिल्हा कार्याध्यक्षपदी ॲड. विजय खारकर यांची नियुक्ती केलेली आहे. प्रदेश कार्यालय मुंबई येथे झालेल्या राज्य कार्यकारणी बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांनी एकमताने जिल्हा कार्याध्यक्ष पदाचा भार सामाजिक कार्यकर्ते तसेच वीज ग्राहक संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष व जनता दल सेक्युलरचे माजी जिल्हा सचिव ॲड विजय खारकर यांची निवड केलेली आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे, मुंबई प्रदेशाध्यक्ष ॲड सुरेंद्र बाजपेयी, राज्य उपाध्यक्ष ॲड सुहास बने, मुंबई कार्याध्यक्ष सलीम भाटी, तसेच रायगड जिल्हाध्यक्ष भगवान साळवी यांनी विजय खारकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **उसर-अलिबाग येथील** गेल/एच.पी. कंपनी जवळ वेलवली बस स्टॉप नजिक नवीन इमारत (एकूण ११ सूसज्ज फ्लॅट) पार्कींग व्यवस्थेसह भाडे तत्वावर देण्याची आहे. कृपया इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा. मोबा. नं. ८४५४८६२७६७
- **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹१४,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम, तसेच जेवणाची व्यवस्था करण्यात येईल. इच्छुकांनी संपर्क साधावा. ७८७५८६६५५५
- **अंकुर नर्सरी-(वाडगाव फाटा, अलिबाग पेण रोड पासून** १ मिनिटाच्या अंतरावर) अलिबाग ५ जून पर्यावरण दिनानिमित्त, सर्व प्रकारची फळझाडांची मजबूत कलमे, फूलझाडे, ईनडोअर प्लांटस, बुके प्लांटस वर भरपूर सवलत! दि. २ जून २६ ते १० जून २६ पर्यंत संपर्क - ९४२३८९०२९५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# जनतेचा पैसा कचऱ्यात!

**■ रोज ५० टन बोगस कचऱ्याची एन्ट्री? ■ कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांचे अँटनी वेस्टच्या आडून काळे कारनामे?**

**| कळंबोली | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका हद्दीतून गोळा होणारा घनकचरा घोट येथील डम्पिंग ग्राऊंडवर टाकला जातो. या कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी महापालिकेकडून कंत्राटदाराला प्रति टन तब्बल २५०० रुपये मोजले जातात. पालिकेच्या अधिकृत नोंदीनुसार शहरातून रोज ४०० ते ५०० टन कचरा या ठिकाणी येतो. परंतु, याच डम्पिंग ग्राऊंडवर आता कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचाराचा डम्पिंग यार्ड बनवला असून, रोज लाखो रुपयांची मलई लाटली जात असल्याची चर्चा आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, डम्पिंग ग्राऊंडचे व्यवस्थापन पाहणाऱ्या अँटनी वेस्ट कंपनीचे तिथे कार्यरत असलेले काही कर्मचारी या महाघोटाळ्याचे मुख्य सूत्रधार आहेत. पनवेल पालिका हद्दीबाहेरील व्यावसायिक, कारखाने किंवा इतर ठिकाणचा कचरा चोरट्या मार्गाने या डम्पिंग ग्राऊंडवर आणला जातो. कंपनीचे कर्मचारी हा बाहेरील कचरा पालिकेच्या अधिकृत कचऱ्यामध्ये वाढवून दाखवतात.

या बदल्यात, ज्याचा कचरा आणला आहे, त्या खासगी घटकांकडून हे कर्मचारी मोठी रोख रक्कम वसूल करतात. तर दुसरीकडे, पालिकेच्या वजनात हा कचरा वाढल्यामुळे कंत्राटदार कंपनीला पालिकेच्या तिजोरीतून प्रति टन २५०० रुपयांप्रमाणे अतिरिक्त पैसे मोजले जातात. रोज साधारण ५० टन कचरा अशाच प्रकारे बोगस वाढवला जात आहे. म्हणजेच, रोज सव्वा लाख रुपये आणि महिन्यातला तब्बल ३५ ते ४० लाख रुपयांचा चुना थेट पनवेलच्या जनतेच्या पैशातून लावला जात आहे, अशी चर्चा आहे.

इतका मोठा गैरप्रकार रोज उघडपणे सुरू असताना स्थानिक प्रशासकीय अधिकारी आणि कंत्राटदार कंपनीचे वरिष्ठ याकडे डोळेझाक करत आहेत. त्यामुळे हा घोटाळा करणाऱ्या कंत्राटदाराच्या संबंधित कर्मचाऱ्यावर नेमका कोणाचा वरदहस्त आहे? पालिकेच्या अधिकाऱ्यांचेही यात साटंलोटं आहे का? असा संतप्त प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. जनतेच्या करातून जमा झालेला पैसा कचऱ्याच्या नावाखाली कंत्राटदाराचे खिसे भरण्यासाठी वापरला जात असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

महापालिकेच्या पैशांची ही सरळसरळ लूट असून, या प्रकरणी घोट डम्पिंग ग्राऊंडवरील सीसीटीव्ही फुटेज, कचऱ्याच्या गाड्यांच्या नोंदी आणि वजनाची काटेकोर तपासणी झाल्यास मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे. या गंभीर प्रकारावर आता पनवेल महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित कंत्राटदार कंपनी अँटनी वेस्ट काय कारवाई करणार, की नेहमीप्रमाणे या घोटाळ्यावरही पडदा टाकण्याचा प्रयत्न होणार, याकडे संपूर्ण पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.

## धोकादायक वीजखांब तात्काळ बदलले

**■ कृषीवलच्या वृत्ताची दखल**
**■ महावितरणकडून तातडीने कार्यवाही**
**■ ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त**

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

बेणसे येथील सिद्धार्थ नगर परिसरातील गंजलेले, तळाशी पोखरलेले व धोकादायक अवस्थेतील वीजखांब अखेर महावितरण विभागाकडून तातडीने बदलण्यात आले आहेत. दैनिक कृषीवलने या गंभीर समस्येला वाचा फोडल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले असून, संभाव्य दुर्घटना टळल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

(छायाचित्र : धम्मशील सावंत)



कृषीवल इफेक्ट

सिद्धार्थ नगर परिसरातील प्रवेशद्वाराजवळील तसेच समीर अडसुळे यांच्या घराजवळील विद्युत खांब पूर्णपणे गंजून जर्जर झाले होते. काही खांब एका बाजूला झुकलेल्या अवस्थेत असल्याने कोणत्याही क्षणी ते कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात होती. याशिवाय बेणसे मोहल्ला परिसरातील आशिफ मोमीन यांच्या घराजवळील धोकादायक पोलबाबतही नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या होत्या. येथील जुने पोल बदलण्यात आले.

विशेष म्हणजे या भागात लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. पावसाळ्याच्या तोंडावर गंजलेल्या पोलमुळे जीवितास गंभीर धोका निर्माण झाला होता. जोरदार वारा किंवा पावसामुळे पोल कोसळून विजेच्या तारा तुटल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात होती.

दरम्यान, या संदर्भातील वृत्त प्रसिद्ध होताच महावितरण विभागाने तातडीने दखल घेत संबंधित धोकादायक वीजखांब हटवून नवीन मजबूत पोल उभारण्याचे काम हाती घेतले. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टळली असून, नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

ग्रामस्थांनी महावितरण विभागाचे आभार मानत, परिसरातील इतर धोकादायक विद्युत यंत्रणांचीही तपासणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## तोडलेल्या फांद्यांमुळे अपघाताची भीती

**■ म्हसळा-श्रीवर्धन मार्गावरील प्रकार**

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रस्त्यालगतच्या झाडांच्या वाढलेल्या फांद्या व वेली छाटण्याचे काम संबंधित यंत्रणांकडून करण्यात येत आहे. मात्र, म्हसळा-श्रीवर्धन राज्यमार्गावर छाटण्यात आलेल्या फांद्या आणि वेली योग्य पद्धतीने हटविण्यात न आल्याने वाहनचालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

या मार्गावरील अनेक ठिकाणी फांद्या अर्धवट तोडलेल्या अवस्थेतच रस्त्यालगत पडून असल्याचे दिसून येत आहे. विशेषतः वळणांवर या फांद्या चारचाकी वाहनांच्या काचांवर आदळत असल्याने चालकांचे लक्ष विचलित होऊन अपघाताचा धोका निर्माण होत आहे.

वाहनचालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने छाटलेल्या फांद्या व वेली तातडीने रस्त्याच्या कडेला व्यवस्थित रचून ठेवाव्यात किंवा त्यांची विल्हेवाट लावावी, अशी मागणी वाहनचालकांकडून संबंधित यंत्रणेकडे करण्यात येत आहे.

## बी.आर. पाटील सेवानिवृत्त

**| रसायनी | प्रतिनिधी |**

एचआयएल इंडिया लिमिटेड, रसायनी येथील डेप्युटी जनरल मॅनेजर बी. आर. पाटील हे ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त कंपनीच्या ट्रेनिंग सेंटरमध्ये सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.



यावेळी युनिट हेड इन्चार्ज राजेश ठोसर, डॉ. पार्थ मुखर्जी, मनोज ठाकूर, एल. बी. सिंग, विनायक देवमाने, एम. एस. खान, निलेश गुजर आदी मान्यवर उपस्थित होते. बी.ई. केमिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतलेल्या बी. आर. पाटील यांनी १९९० मध्ये एचआयएलमध्ये प्रवेश केला होता. ३५ वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी डीडीटी, मेलाथॉन, एमसीपी, ॲसिफेट, हीलगोल्ड, एलएलआयएन तसेच पर्सोनल आणि कमर्शियल विभागात विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या होत्या.

यावेळी आर. डी. पाटील, अतुल ठाकूर, शेखर पाटील, राजीव शिंदे यांनी मनोगते व्यक्त करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी, कामगार व महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सुनील निकाडे यांनी केले.

## विचुंबेतील कथित भ्रष्टाचाराची चौकशी सुरू

**२ जूनला प्रत्यक्ष तपासणी; मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कारवाई**

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील विचुंबे ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचार प्रकरणाला आता अधिकृत चौकशीचे स्वरूप प्राप्त झाले असून, या प्रकरणाची सखोल तपासणी करण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. पुरुषोत्तम भोईर यांनी केलेल्या तक्रारीनंतर पंचायत समिती उरण कार्यालयाने याबाबत हालचाली सुरू केल्या असून, संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाला अधिकृत पत्र पाठवण्यात आले आहे.

रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार या प्रकरणासाठी चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तक्रारीमध्ये ग्रामसेवक आणि सरपंच यांनी विविध विकासकामे व आर्थिक व्यवहारांमध्ये कथित गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला असून, संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, २ जून ग्रामपंचायत विचुंबे येथे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. या तपासणीदरम्यान ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांशी संबंधित कागदपत्रे, ठराव पुस्तिका, विकासकामांचे अभिलेख, खर्च नोंदी तसेच इतर आवश्यक दस्तऐवज सादर करण्याचे निर्देश ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

या प्रकरणामुळे विचुंबे परिसरात मोठी चर्चा सुरू झाली असून, चौकशीत नेमके काय निष्पन्न होते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. अनेक ग्रामस्थांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तर काहींनी विकासकामांच्या निधीचा योग्य वापर झाला का, याचीही सखोल तपासणी व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

दरम्यान, पंचायत समिती उरणचे गटविकास अधिकारी संजराव पाटील यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या पत्राची प्रत संबंधित ग्रामपंचायत तसेच जिल्हा परिषद प्रशासनालाही पाठविण्यात आली आहे. त्यामुळे आता या चौकशीतून कोणते तथ्य समोर येते आणि प्रशासन पुढे कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचारप्रकरणी कारवाईचा बोजवारा?

**| उरण | प्रतिनिधी |**

चाणजे ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचारप्रकरणी तक्रार होऊन जवळपास दोन वर्षांचा कालावधी उलटत आला, तरी अद्याप संबंधित दोषींवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**वरिष्ठ अधिकारीही संशयाच्या भोवऱ्यात**

या प्रकरणात ग्रामस्थ सचिन रमेश डाऊर यांनी ग्रामनिधी, पाणीपुरवठा, साहित्य खरेदी, टँकर बिल, सौरऊर्जा दिवे, घनकचरा प्रकल्प आणि विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे प्रत्यक्ष भेट घेऊन केली होती. चौकशीदरम्यान गंभीर अनियमितता समोर आल्याने तत्कालीन ग्रामविकास अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाईही करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही सरपंच आणि संबंधित जबाबदार व्यक्तींवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे "या भ्रष्टाचारातील लाखोंच्या मलिद्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही वाटा असल्यानेच कारवाईला जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे का?" असा संशय आता तक्रारदाराने व्यक्त केला आहे.

तक्रारदाराच्या मते, प्रथमदर्शनीच अनेक व्यवहार संशयास्पद दिसत असून, बाजार भावापेक्षा ३०० ते ५०० टक्के जास्त दराने साहित्य खरेदी, नियमबाह्य बिले, ग्रामसभेची मंजुरी नसलेली कामे आणि कागदोपत्री विकासकामांचा मोठा घोटाळा झाला आहे. तरीदेखील संबंधित अधिकारी कारवाई करण्याऐवजी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

जनतेचा पैसा लुटून भ्रष्ट मंडळी मोकाट फिरत आहेत आणि प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

## ५ जून रोजी पेन्शनर्सची सभा

**रसायनी :** रसायनी आणि पाताळगंगा परिसरातील सर्व पेन्शनधारकांसाठी एक महत्त्वाची सभा शुक्रवार, दिनांक ५ जून रोजी आयोजित करण्यात आली आहे. मोहोपाडा येथील आंबेडकर भवन येथे सकाळी ठीक १० वाजता ही सभा सुरू होईल. या सभेमध्ये पेन्शनधारकांना मार्गदर्शन करण्यासाठी अनिल तेंडुलकर आणि इतर मान्यवर सहकारी उपस्थित राहणार आहेत. पेन्शनधारकांच्या विविध समस्या आणि त्यांना मिळणाऱ्या सुविधांबाबत या सभेत चर्चा होण्याची शक्यता आहे.

## वाढदिवसानिमित्त मोफत हृदय तपासणी शिबीर

**| सुकेळी | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील शिहु येथील दामोदर हरी भोईर यांच्या ७० व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन डॉ. भोईर क्लिनिक या ठिकाणी सुश्रुषा हार्ट केअर सेंटर आणि स्पेशालिटी हॉस्पिटल नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत हृदय तपासणी शिबिराचे आयोजन सोमवार, दि.१ जून २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये ईसीजी, रक्तातील साखरेचे प्रमाण, कार्डियॅक संबंधित मार्गदर्शन, इत्यादी सुविधा मिळणार आहेत. तसेच रुग्णालयामध्ये २ डी ईको, टीएमटी (स्ट्रेस टेस्ट), ॲन्जिओग्राफी, ॲन्जिओप्लासटी आदी सुविधा मिळणार आहेत. तरी या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. भोईर क्लिनिकचे प्रमुख डॉ. पुरुषोत्तम भोईर, डॉ. प्रिया भोईर, नित्यानंद कुथे, चेतन पोवळे, विजय पाटील यांनी केले आहे.

**प्रा. विजय नवलेंचे तरुणांना आवाहन | क्षमता ओळखून पाल्याला दिशा द्या**

# नोकरीच्या मागे न धावता, उद्योजक बना

**| उरण | प्रतिनिधी |**

नागाव येथे आयोजित करिअर मार्गदर्शन व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात करिअर मार्गदर्शक तथा इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स गौरवप्राप्त प्रा. विजय नवले यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत फक्त नोकरीच्या मागे धावण्याऐवजी स्वतः रोजगारनिर्माते बनण्याचे आवाहन केले. MKCL रायगड विभाग व छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



नागाव येथील अंगण लॉन येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॉफी, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. नवले यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना, "डॉक्टर, इंजिनिअर किंवा सीए होणे म्हणजेच यश नव्हे. एका क्षेत्रात अपयश आले तरी आयुष्यात अनेक संधी उपलब्ध असतात. जिद्द, आत्मविश्वास आणि योग्य दिशेने केलेले प्रयत्न यशाकडे घेऊन जातात, असे त्यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्तमुळे रोजगार कमी होणार नसून, नव्या संधी निर्माण होणार आहेत. मोबाईल आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घरबसल्या व्यवसाय व सेवा सुरू करता येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नोकरी मागणारे नव्हे तर रोजगार देणारे बनण्याचा विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी, क्षमता आणि गुण ओळखून त्यांना योग्य दिशा द्यावी, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी सभापती महेश म्हात्रे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अपयशाने खचून न जाता सातत्याने प्रयत्न करण्याचा सल्ला दिला. स्पर्धेच्या युगात मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यश मिळवता येते, असे ते म्हणाले.

माय नॉलेज हब कॉम्प्युटर एज्युकेशन, उरण यांच्या विशेष पुढाकारातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास सभापती महेश म्हात्रे, सल्लागार कोकण विभाग जयंत भगत, डॉ. मोहमीन हसन, राकेश जुगरकर, पत्रकार घनःश्याम कडू, कोशे सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माळी मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मिटकोनच्या टीमने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थी, पालक आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

# आंबेवाडीत पुरजन्य परिस्थितीची शक्यता



। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील आंबेवाडी बाजारपेठेत यावर्षी पावसाळा सुरु झाल्यानंतर पुरजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण एका बाजूला उड्डाण पुल व दुसऱ्या बाजूला निकृष्ठ दर्जाचे गटाराचे कामामुळे या बाजारपेठेतील नागरिकांना पुराचा सामना करावा लागणार आहे.

आंबेवाडी बाजारपेठेतील उड्डाण पुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मात्र, गटाराचे काम अद्यापही अपूर्ण स्थितीत आहे. या महामार्गाच्या एका बाजूला उड्डाणपुल तर दुसऱ्या बाजूला अपूर्ण व निकृष्ठ दर्जाच्या गटाराचे काम हे पुरस्थिती निर्माण होण्याचे मुख्य कारण असणार आहे. महामार्गावरील रस्ता खाली व गटारावर असल्यामुळे साचलेले पावसाचे पाणी जाण्यासाठी जागा राहिली नाही. यामुळे पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊन हे पुराचे पाणी व्यावसायिकांच्या दुकानात शिरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

या गटारावर झाकण नसल्यामुळे या गटारात गुरे ढोरे ही जखमी होत असतांना दिसत आहेत. एकीकडे मे महिन्या अखेर महामार्गाचे काम पूर्ण होईल अशी नवीन डेडलाईन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली होती. परंतु, जुन महिना उजाडला तरी हे काम पूर्ण झाले नाही. याची खंत नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY'S, ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, VESHVI–ALIBAG – 201 209.
(UnAided)

**WALK-IN-INTERVIEW**

The walk-in-interview are arranged at Head Office of the PNP Education Society, Veshvi -Alibag on **09/06/2026** at **11.00 a.m.** to fill up the following posts of teachers on purely temporary and contract basis.

| Sr. No. | Name of the subject | No. of Posts |
|---|---|---|
| 1 | Marathi | 02 |
| 2 | Hindi | 02 |
| 3 | History | 02 |
| 4 | Economics | 01 |
| 5 | English | 01 |
| 6 | Geography | 02 |
| 7 | Commerce & A/C | 02 |
| 8 | Chemistry | 08 |
| 9 | Physics | 02 |
| 10 | Botany | 02 |
| 11 | Microbiology | 01 |
| 12 | Mathematics | 01 |
| 13 | Zoology | 01 |
| 14 | Computer Science | 06 |
| 15 | Business Law | 01 |
| 16 | Librarian | 01 |

Educational Qualifications as per the norms of University of Mumbai, Post graduate in concern subject with NET/SET or Ph.D. for Senior College and as per the Department of Education, Govt. of Maharashtra.

**Instructions**
- NoT.A./D.A.will be paid for attending the interview.
- Bring the attested Xerox copies of all the academic documents and original documents along with the application.
- Final recruitment will be based on available workload of the respective subject.
- If reserve category candidate is not available, open category candidate may be considered.

**Place** : Head Office of the PNP Education Society,Veshvi,Alibag- Raigad.
**Date of Interview** : 09 June 2026.
**Reporting Time** : 10:30 a.m.

Sd/-
(Mrs. Chitralekha N. Patil)
SECRETARY.
PNP Education Society, Veshvi-Alibag.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे आनंदवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून सदर मिळकत विकसनासाठी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| दिपक बबन मरे | ६९/२/एम | ०-०५-६८ | ०.१५ |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे विकसनाचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे मार्केवाडी, ता- कर्जत, जि- रायगड येथील शेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक रविंद्र कुमार कृष्णा मुर्ती गोरीपोर्टी, रा - लँडमार्क सी. एच एस, एल.टी.डी दाऊद बाग, जे पी रोड, डॉक्टर देव समोर अंधेरी वेस्ट मुंबई ४०००५८ यात्री खालील वर्णन केलेली मौजे मार्केवाडी येथील जमीन मिळकतीचे वर्णन

| सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २९ | २/ ब | एकुण क्षेत्र - ०.८५.२० हे. आर. पॉ. पैकी विकत देणार यांच्या मालकीचे क्षेत्र ०.२०.०० हे. आर पॉ. या मिळकतीबाबत | १.१८ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदर मिळकत कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही है कळावे.

दिनांक ०१/०६/२०२६

**ॲड. भारत अंकुश सावंत**
(बीकॉम. एल. एल. बी)
पत्ता- मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

## धनाजी घरत यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

। खरोशी । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा पेण येथील सहाय्यक शिक्षक धनाजी रामभाऊ घरत यांची निवड करण्यात आली आहे. ५ जून रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात येणार आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री. उदयसिंग लक्ष्मण राणे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १५/६ | एकुण क्षेत्र १-५२-०० हे आर पॉ | ०-३७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितासंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०१/०६/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९ तळ मजला,
हिरापन्ना शापिंग, प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळमजला
हिरापन्ना शॉपिंग, प्लाझा बिल्डींग
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री. प्रविण पंडीत भालेराव व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १५/४/अ | एकुण क्षेत्र १-९५-०० हे आर पॉ | ०-५२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०१/०६/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९ तळ मजला,
हिरापन्ना शापिंग, प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळमजला
हिरापन्ना शॉपिंग, प्लाझा बिल्डींग
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग

मु. स्नेहसदन श्रीबाग अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
फोन नं. ९१५६७६६०७७

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये

### जाहीर फेरलिलाव नोटीस

जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या पतसंस्थेतून श्रीमती सोनाली पांडुरंग पाटील/श्रीमती. रूपाली रामचंद्र पाटील मु.श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता. अलिबागा जि. रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी त्याचे खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार मंगळवार दिनांक ३०/०६/२०२६ रोजी सकाळी ठिक १२.३० वाजता वसुली अधिकारी हे जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग शाखेत हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत जाहिर लिलावाने विक्री करतील.

**जाहिर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव व मालमत्ता धारकाचे नाव व पत्ता | मालमत्तेचे वर्णन व तपशील | वाजवी मुल्य |
|---|---|---|
| श्रीमती. सोनाली पांडुरंग पाटील / श्रीमती. रूपाली रामचंद्र म्हात्रे मु. श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड | मौजे चेंढरे ता. अलिबाग जि.रायगड येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील भुमापन क्र.व. उपविभाग ९५/०१ क्षेत्र ०-०५-३० हि मिळकत | मा. जिल्हा उपनिबंधक सो, सहकारी संस्था रायगड-अलिबाग यांनी निश्चित केलेली वाजवी किंमत ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख मात्र |

**लिलावाच्या शर्ती व अटी -**

१ जाहिर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू. १,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख ) मात्र एवढी रक्कम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार वसुली अधिकारी व पतसंस्थेकडे राहतील.
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पुर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६. अपसेट प्राइज (वाजवी किंमत) पेक्षा कमी किमतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत अपसेट प्राइज रू. ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख रूपये इतकी आहे.
७. मालमत्तेच्या हस्तांतरणाची स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन खर्च व इतर थकीत देय संबधित खर्च भागविण्याची जबाबदारी ही यशस्वी खरेदीदार/बोलीदार यांची राहील.

ठिकाण-अलिबाग
दि. ०१/०६/२०२६

**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी**
**रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थाचा महासंघ म. अलिबाग**

## जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग

मु. स्नेहसदन श्रीबाग अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
फोन नं. ९१५६७६६०७७

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये

### जाहीर फेरलिलाव नोटीस

जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या पतसंस्थेतून श्रीमती मंदा पांडुरंग पाटील/श्री रामचंद्र नागु म्हात्रे मु. श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी त्याचे खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार मंगळवार दिनांक ३०/०६/२०२६ रोजी सकाळी ठिक १.३० वाजता वसुली अधिकारी हे जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग शाखेत हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत जाहिर लिलावाने विक्री करतील.

**जाहिर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव व मालमत्ता धारकाचे नाव व पत्ता | मालमत्तेचे वर्णन व तपशील | वाजवी मुल्य |
|---|---|---|
| श्रीमती. मंदा पांडुरंग पाटील /श्री. रामचंद नाग्रु म्हात्रे मु श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड | मौजे चेंढरे ता. अलिबाग जि.रायगड येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील भुमापन क्र.व उपविभाग ९५/०१ क्षेत्र ०-०५-३० हि मिळकत | मा. जिल्हा उपनिबंधक सो, सहकारी संस्था रायगड-अलिबाग यांनी निश्चिंत केलेली वाजवी किंमत ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख मात्र |

**लिलावाच्या शर्ती व अटी -**

१ जाहिर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू. १,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख ) मात्र एवढी रक्कम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार वसुली अधिकारी व पतसंस्थेकडे राहतील.
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पुर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६. अपसेट प्राइज (वाजवी किंमत) पेक्षा कमी किमतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत अपसेट प्राइज रू. ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख रूपये इतकी आहे.
७. मालमत्तेच्या हंस्तातरणाची स्टॉम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन खर्च व इतर थकीत देय संबधित खर्च भागविण्याची जबाबदारी ही यशस्वी खरेदीदार /बोलीदार यांची राहील.

ठिकाण-अलिबाग
दि. ०१/०६/२०२६

**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी**
**रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थाचा महासंघ म. अलिबाग**


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की आमचे अशिलांनी यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**शेती मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाचे नाव | गावाचे नाव | स.न/ हि.न. | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|
| अर्चना बिहारीलाल कलवार महेश गोपाळ पालांडे | ताडवाडी | १५/५ अ | ०१-७७-०० ००-३८-०० एकूण ०२-१५-०० | २ रू ८२ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. ०१/०६/२०२६

सही
**ॲड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता - नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत - रायगड मो.नं. ९८८११३२२४८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मंदार द्वारकानाथ पुरोहित व इतर, रा. घर नं. ८९४, विष्णू मंदिराजवळ, चवदार तळे, महाड, ता. महाड, जि. रायगड यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील बिनशेती मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग जि. रायगड | ६६ | क्षेत्र १२-५०-०० | १२५.०० |
| नागाव ता. अलिबाग जि.रायगड | ७४ | क्षेत्र ४०-२०-०० | ४०२.०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २८/०५/२०२६

**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर,
शॉप नं. ४, सब रजिस्टर ऑफिस अलिबाग जवळ,
मु. पो. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९९२२७१७०३१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. समिर अनिल चेंदवणकर यांनी मौजे आंबेघर, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी असणारे विद्यमान मालक सौ. भाग्यश्री भरत हजारे यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-०२-०० (हे.आर.चौ.मी) एवढे क्षेत्र हे त्यांचेकडुन कायम स्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| आंबेघर | ४६ | ००-०२-०० | ०.०६ |

वर वर्णन केलेल्या सदरहू जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी भोगवटादार व मालक म्हणून असणारे विद्यमान मालक सौ. भाग्यश्री भरत हजारे यांचे मालकीचे असे ००-०२-०० (हे.आर.चौ.मी) एवढे क्षेत्र हे प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे. सदरची मिळकत ही विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणचीही विक्री, गहान, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात आणून द्यावेत. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडुन दिला आहे असे गृहित धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पेण
दि.०१/०६/२०२६

**ॲड. संदेश दिनकर गावंड**
रा. मु.दुरशेत, पो. बळवळी ता. पेण, जि. रायगड
मो.क्र.७०३०३३३६५४/८६०५४१४५६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे बेंडसे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर मिळकतीचे मालक सौ. ज्योती महेंद्र ठाकुर यांचेकडुन विकत घेण्याची ठरवलेली आहे.

| सर्व्हे क्रमांक | क्षेत्र चौ. मी | आकार |
|---|---|---|
| २९/१४ क | ०.४१.०० | ०.३० |
| २९/१४ ब | ०.४९.०० | ०.५० |
| २९/१४/अ/२ | ०.६१.०० | ०.५५ |
| २९/१९ | ०.१६.०० | ०.१० |
| २९/१४/अ/१ | ०.६१.०० | ०.६० |
| २९/१५ | ०.११.०० | ०.१५ |
| २९/६ | ०.०८.०० | ०.१० |
| २४/४ अ | ०.२४.०० | २.२९ |
| २८/१ | ०.०१.०० | ०.०५ |
| २८/२ | ०.०५.०० | ०.१० |
| २८/३ | ०.०७.०० | ०.१५ |
| २६/२ | ०.१७.७० | ०.४० |
| २९/९ | ०.०६.०० | ०.०५ |
| २९/१० अ | ०.२१.०० | ०.३० |
| २९/१० ब | ०.४३.०० | ०.६० |
| २९/१३ | ०.०६.०० | ०.०५ |
| २६/१ | ०.१५.२० | ०.८० |
| २६/३ | ०.०९.८० | ०.१० |
| २६/४ | ०.०७.६० | ०.८० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध केल्यापासुन १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत दाखल न झालेस सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत.

दिनांक ३१/०५/२०२६

**ॲड. ऋषीकेश अनिल कांबळे**
बी.ए.एल.एल.बी.
नेरळ, कुंभार आळी,
जिल्हा परिषद शाळेसमोर,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९५६१७३४३७७

## निवडक



### फायटर्स अकॅडमी अंतिम फेरीत

**अलिबाग :** झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित पै. अन्वर बुराण स्मृती चषक चौदा वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघ अंतिम सामन्यासाठी दाखल झाला आहे. शनिवारी झुंझार पोयनाडच्या मैदानावर झालेल्या पहिल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाने पचौरी क्रिकेट अकॅडमी कामोठे संघावर ४९ धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. प्रथम फलंदाजी करतांना फायटर्स माणगाव संघाने निर्धारित ४० षटकांच्या समाप्ती नंतर २२१ धावा काढल्या त्यामध्ये यश देढे यांनी सर्वाधिक ४४ तर पार्थ मस्के यांनी ४० धावांचे योगदान संघाला दिले. पचौरी क्रिकेट अकॅडमी कडून आर्यन चौहान यांनी ३ वरद गोवारी व तीर्थराज धाबडकर यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. २२१ धावांचे लक्ष घेऊन फलंदाजीला आलेल्या पचौरी कामोठे संघानी ४० षटकात १७२ धावाच काढल्या त्यामध्ये प्रज्वल गोवारी यांनी २२ वरद गोवारी १९ जैब शेख १९ व झिदान कापडे यांनी १८ धावांचे योगदान संघाला दिले. फायटर्स माणगाव संघाकडून ऋग्वेद जाधव यांनी ४ ईशान काटे व साई टेंबे यांनी २ फलंदाजाना बाद केले. सामना जिंकून फायटर्स माणगाव संघ अंतिम फेरीत दाखल झाला असून पचौरी क्रिकेट अकॅडमी संघाला स्पर्धेत तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे. सामनावीर म्हणून ऋग्वेद जाधव, फायटर ऑफ दि मॅच वरद गोवारी उत्कृष्ट क्षेत्ररक्षक देवेश शिंदे व झेन शेख यांना झुंझारचे सचिव किशोर तावडे, अजय टेमकर, तहसीन बुराण,आलीजा बुराण, प्रशिक्षक रोहित काळे, वीरू पचौरी यांच्या हस्ते चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

### नाओमी ओसाका पुढच्या फेरीत

**नवी दिल्ली :** गतविजेती कोको गॉफचा फ्रेंच ओपनमधील महिला एकेरी विजेतेपदाचा बचाव तिसऱ्या फेरीतच थांबला, पण नाओमी ओसाकाने आपली प्रभावी कामगिरी सुरुच ठेवली. या सामन्यात गॉफला अशा खेळाडूनं पराभूत केले, जिने लांब बेसलाइन रॅली आणि कोर्ट कव्हरेजमध्ये अमेरिकन खेळाडूला तोडीस तोड



उत्तर दिले. ही खेळाडू होती अनास्तासिया पोतापोव्हाने, जिने शनिवारी तिसऱ्या फेरीत गॉफला ४-६, ७-६ (१), ६-४ असे हरवले. यापूर्वी, आपल्या १०० व्या ग्रँड स्लॅम सामन्यात, ओसाकाने १८ वर्षीय अमेरिकन प्रतिस्पर्धी इव्हा जोविकला जवळपास तीन तासांत ७-६ (५), ६-७ (३), ६-४ असे हरवले. ओसाकाचा पुढील सामना जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या आर्यना सबालेन्काशी होईल, जिने दारिया कासात्किनाला ६-०, ७-५ असे हरवले. फ्रेंच ओपन २०२६ चा हंगाम अनपेक्षित निकालांचा ठरत आहे. फ्रान्सच्या डियान पॅरीनं शनिवारी सहाव्या मानांकित अमांडा अनिसिमोवाला तीन-सेटच्या सामन्यात पराभूत करून प्रथमच ग्रँड स्लॅमच्या चौथ्या फेरीत प्रवेश केला. या वर्षीच्या फ्रेंच ओपनपूर्वी, पॅरी पाच वेळा ग्रँड स्लॅमच्या तिसऱ्या फेरीत पोहोचली होती, परंतु ती कधीही अंतिम १६ मध्ये पोहोचली नव्हती. शनिवारी कोर्ट फिलिप-चॅट्रियरवर पॅरिसच्या उत्साही प्रेक्षकांसमोर खेळताना, पॅरीने अमांडा अनिसिमोवाला दोन तास आणि ४४ मिनिटं चाललेल्या तीन-सेटच्या सामन्यात ६-३, ४-६, ७-६ असं पराभूत केले.

### सात्विक-चिराग अंतिम फेरीत

**नवी दिल्ली :** सिंगापूर ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत ३० मे रोजी एक मोठा धक्कादायक निकाल लागला, जेव्हा भारताच्या सात्विक आणि चिराग या स्टार



जोडीने दक्षिण कोरियाच्या किम वॉन हो आणि सेओ सेउंग जे या सध्याच्या जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या जोडीला सलग सेट्समध्ये पराभूत करुन अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केले. सध्या चौथ्या क्रमांकावर असलेल्या सात्विक आणि चिराग यांना हा सामना जिंकण्यासाठी जवळपास एक तास संघर्ष करावा लागला. या उपांत्य फेरीच्या सामन्यात दोन्ही जोड्यांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. पहिल्या सेटमध्ये, मध्यंतरापर्यंत दक्षिण कोरियाची जोडी १३-११ नं आघाडीवर होती. मात्र, चिराग आणि सात्विक यांनी उल्लेखनीय पुनरागमन करत पहिला सेट २१-१९ नं जिंकून १-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सेटमध्ये, दक्षिण कोरियाची अव्वल जोडी एका क्षणी १४-११ नं आघाडीवर होती, परंतु सात्विक आणि चिराग यांनी योग्य वेळी पुनरागमन करत सामना २१-१८ नं जिंकला आणि अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केले.

## चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धा

# पीएसजीने सलग दुसऱ्यांदा अजिंक्य

### सेलिब्रेशनमध्ये तोडफोड आणि जाळपोळ, ४१६ लोकांना अटक; ७ सुरक्षा कर्मचारी जखमी

**। फ्रान्स । वृत्तसंस्था ।**

चॅम्पियन्स लीगमध्ये पॅरिस सेंट-जर्मेनच्या विजयाच्या सेलिब्रेशनला दंगलीचे स्वरूप आले. रविवार पहाटे फ्रान्समधील वेगवेगळ्या शहरांमध्ये तोडफोड, जाळपोळ आणि हिंसेच्या अनेक घटना घडल्या. पोलिसांनी ४१६ उपद्रवींना अटक केली आहे. गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार, सर्वाधिक तणाव पॅरिसमध्ये होता, जिथे २८० लोकांना ताब्यात घेण्यात आले. या झटापटीत ७ पोलीस कर्मचारी जखमी झाले.

आंतरिक व्यवहार मंत्री लॉरेंट नुनेज यांनी हिंसेचा निषेध करत, ही परिस्थिती पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचे म्हटले आहे. बुडापेस्टमध्ये खेळल्या गेलेल्या युईएफए चॅम्पियन्स लीग फायनलमध्येपीएसजीने आर्सेनलला पेनल्टी शूटआउटमध्ये ४-३ ने हरवले. त्यांनी सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले.पीएसजीने गेल्या वर्षी




म्युनिकमध्ये इंटर मिलानला ५-० ने हरवले होते. आता १९९३ नंतर आपले विजेतेपद राखणारा जगातील दुसरा क्लब बनला. स्पर्धेच्या इतिहासातपीएसजी सलग दोनदा विजेतेपद जिंकणारा १० वा क्लब ठरला. चॅम्पियन्स लीगच्या आधुनिक युगात रियल माद्रिदच आपले विजेतेपद राखण्यात यशस्वी ठरले होते. रियल माद्रिदने २०१६ ते २०१८ दरम्यान तीन वेळा ट्रॉफी जिंकली होती. आता या यादीत पीएसजीचे नावही जोडले गेले आहे. विजेतेपद जिंकल्यानंतर पीएसजीचेव्यवस्थापकलुईसएनरिक भावुक दिसले.

उत्साहही आहे आणि थकवा देखील, सर्व काही एकाच वेळी आहे. पण हा या संपूर्ण हंगामातील सर्वात शानदार क्षण आहे. आम्ही अजूनही चॅम्पियन्स आहोत, तेही सलग दोन वेळा. हे खरोखरच अद्भुत आणि अविश्वसनीय आहे. पीएसजीच्या यशामागे संघातील एकजूट हे मोठे कारण होते. आर्सेनलविरुद्धच्या अंतिम सामन्यात, मागील वर्षी इंटर मिलानविरुद्ध खेळलेले १० मैदानी खेळाडू तेच होते. संघात फक्त गोलकीपर बदलला होता. जियानलुइगी डोनारुमा उन्हाळी हस्तांतरणात मँचेस्टर सिटीला गेले होते, त्यांच्या जागी मॅटवे सफोनोव्हने जबाबदारी सांभाळली होती. गेल्या २ वर्षांपासून लुईस एनरिकच्या संघाचे वर्चस्व राहिले आहे.

गेल्या हंगामापासून आतापर्यंतपीएसजीने १० पैकी ८ ट्रॉफी जिंकल्या आहेत. ते फक्त क्लब वर्ल्ड कप आणि या हंगामातील फ्रेंच कपमध्ये हरले. जरपीएसजीची कामगिरी अशीच सुरू राहिली, तर ते सलग तीन वेळा चॅम्पियन्स लीग जिंकणारा पाचवा संघ बनू शकतात. मात्र, रिअल माद्रिदच्या १९५६-१९६० मधील ५ विजेतेपदांच्या विक्रमापासून ते अजूनही दूर आहेत. या हंगामात पीएसजी प्रत्येक बाबतीत सर्वोत्तम ठरला. संघाने चॅम्पियन्स लीगमध्ये ४५ गोल केले आणि सरासरी बॉल पजेशन ६०.५ टक्के राहिले. हा त्यांचा तिसरा अंतिम सामना होता. २०१९-२० मध्ये पहिल्या अंतिम सामन्यात बायर्न म्युनिककडून १-० ने पराभव पत्करावा लागला होता. आता दोन विजेतेपदे जिंकून पीएसजी फ्रान्सचा सर्वात यशस्वी क्लब बनला आणि मार्सेलाला मागे टाकले, ज्याच्या नावावर एक विजेतेपद आहे.

# विनेश फोगाटच स्वप्न भंगलं

### उपांत्य फेरीत ६-४ ने मिळाली मात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

एशियन्स गेम्स २०२६ स्पर्धा १९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. ही स्पर्धा ४ ऑक्टोबरला संपणार आहे. या स्पर्धेत क्रिकेटसह ४३ विविध खेळांचा समावेश आहे. एशियन्स गेम्स २०२६ स्पर्धेतील पात्रतेसाठी दिल्लीत निवड चाचणी स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी सुप्रीम कोर्टाकडून तिला हिरवा कंदील मिळाला होता. त्यामुळे तिच्या कामगिरीकडे लक्ष लागून होतं. पण या स्पर्धेत विनेश फोगाट अपयशी ठरली. उपांत्य फेरीत मीनाक्षीने तिला ४-६ ने मात दिली. त्यामुळे आठ वर्षानंतर एशियन्स गेम्समध्ये



पुनरागमन करण्याची संधी हुकली. विनेश फोगाट ५३ किलो वजनी गटाच्या निवड चाचणी उपांत्य फेरीत पराभूत झाली. पराभवामुळे विनेशचा पुनरागमन करण्याचा प्रयत्न फसला आहे. या वर्षाच्या अखेरीस जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या एशियन्स गेम्ससाठी पात्र ठरण्याची तिची संधी संपुष्टात आली. चाचणी स्पर्धेत विनेश कोणत्या गटातून खेळणार यावरून वादाची ठिणगी पडली होती. त्यानंतर तिला फक्त ५० किलो गटातच स्पर्धा करण्याची परवानगी असल्याचे सांगितले. कारण पॅरिस ऑलिम्पिकसह तिने मागच्या चार आंतरराष्ट्रीय स्पर्धेत याच गटातून भाग घेतला होता. पण विनेशने यावर आक्षेप नोंदवला. त्यानंतर तिने पसंतीच्या गटातून खेळण्याची मागणी केली. विनेशचं वजन ५३.९ किलोग्रॅम असल्याने तिला ५३ किलो वजनी गटात ठेवलं गेलं. भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह म्हणाले की, विनेशने आरोप केल्यानंतर, आम्ही अधिकाऱ्यांना तिचे वजन मोजण्याची परवानगी दिली.

उपांत्यपूर्व फेरीत विनेश फोगाटचा सामना निशूसोबत झाला. या सामन्यात अतितटीची लढत झाली.खडतर लढतीत कोण बाजी मारेल याची उत्सुकता होती. पण शेवटच्या क्षणी आपल्या अनुभवाच्या जोरावर विनेशने बाजी मारली. या सामन्यात ७-६ असा निसटता विजय मिळवला आणि अव्वल चारमध्ये स्थान पटकावले. पण उपांत्य फेरीत तिच्या आशा संपुष्टात आल्या.

## गोल्ड मेडलिस्ट चिराग त्यागीची हत्या

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिवसेंदिवस देशातील गुन्हेगारीचे सत्र वाढतच चालले आहे. गाझियाबादमधून एक अतिशय धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. आंतरराष्ट्रीय पॅरा-ॲथलीट चिराग त्यागीची थेट गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. या घटनेने देशभरात खळबळ माजली आहे. कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या साई उपवन येथे त्याचा मृतदेह आढळून आला. तो सकाळी दिल्लीतील वसतिगृहातून मुरादनगरमधील बसंतपूर साथली या आपल्या गावी जाण्यासाठी निघाला होता.

याच दरम्यान त्याची हत्या करण्यात आली. पोलीस आता या प्रकरणाचा तपास करत आहेत. त्यांनी चिरागचा जवळचा मित्र यश खटीकला अटक केली आहे.

गाझियाबादमधील कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या साई उपवनमध्ये राष्ट्रीय पॅरा-ॲथलीट चिराग त्यागीचा मृतदेह आढळून आला आहे. तो सकाळी दिल्लीतील वसतिगृहातून मुरादनगरमधील बसंतपूर साथली या आपल्या गावी जाण्यासाठी निघाला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, त्याच्या पाठीवर एक छिद्र आहे. हे छिद्र गोळी लागल्याने झाले आहे. हे शवविच्छेदनानंतरच स्पष्ट होईल.




## नेहरू स्टेडियमचे रूप पालटणार

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

अनेक वर्षांपासून दुरवस्थेत असलेल्या स्वारगेट येथील पंडित नेहरू स्टेडियमचे रूप लवकरच पालटणार असून भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) मानकांनुसार या मैदानाचे नूतनीकरण होणार आहे. महापालिकेच्या भवन विभागाने स्टेडियमचे स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण केले आहे. स्टेडियमच्या नूतनीकरणाचा संपूर्ण आराखडा अंतिम मंजुरीसाठी महापालिका आयुक्तांकडे पाठवला जाणार असून, येत्या दोन महिन्यांत निविदा प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती भवन रचना विभागाने दिली.


महापालिकेच्या क्रीडा समितीने स्टेडियमची पाहणी केली. त्याचबरोबर भवन रचना विभागाचे उपअभियंता, कार्यकारी अभियंता आणि स्टेडियम प्रशासनाने मैदानाची सविस्तर पाहणी केली.

या वेळी बीसीसीआयचे माजी पिच क्युरेटर नदीम मेनन यांच्यासह विविध तज्ज्ञ उपस्थित होते. बीसीसीआयच्या सामन्यांचे शहरात पुन्हा आयोजन करता यावे, या दृष्टीने मैदानातील प्रत्येक त्रुटी दूर केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले..या प्रकल्पांतर्गत मुख्य मैदान आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची नवीन खेळपट्टी तयार केली जाईल. पॅव्हेलियनचे नूतनीकरण, अद्ययावत प्रकाशयोजना आणि प्रेक्षकांसाठी बसण्याची सोय केली जाईल. डिजिटल धावफलक व एलईडी स्क्रीनही बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे पुणेकरांना नेहरू स्टेडियमचे नवे स्वरूप पाहायला मिळणार आहे.

# फोन्सेकाने जोकोविचचा केला गेम ओव्हर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

फ्रेंच ओपन २०२६ मध्ये टेनिसविश्वाला सर्वात मोठा उलटफेर पाहायला मिळाला. पॅरिसमधील रोलँड गॅरोसवर खेळल्या गेलेल्या या थरारक लढतीत १९ वर्षीय ब्राझिलियन जोआओ फोन्सेकाने २४ ग्रँड स्लॅम विजेतेपदांचा मानकरी आणि स्टार टेनिसपटू नोव्हाक जोकोविचचा पराभव करत इतिहास रचला. जवळपास पाच तास रंगलेल्या या सामन्यात जोकोविचने सुरुवातीपासूनच आपला अनुभव दाखवत



पहिले दोन सेट्स ६-४,६-४ अशा फरकाने जिंकले. त्या क्षणी सामना एकतर्फी होईल आणि सर्बियन दिग्गज सहजपणे पुढील फेरीत पोहोचेल, असे वाटत होते. मात्र त्यानंतर सामन्याचे चित्र पूर्णपणे बदलले. फोन्सेकाने जबरदस्त पुनरागमन करत पुढचे तीन सेट्स ६-३, ७-५ आणि ७-५ असे जिंकले.

सामन्याच्या सुरुवातीला अनुभवी जोकोविचने आपला दबदबा कायम ठेवत पहिले दोन सेट सहज जिंकले. त्याच्या अचूक सर्व्हिस आणि दमदार रिटर्नसमोर फोन्सेका संघर्ष करताना दिसत होता. पण तिसऱ्या सेटपासून या ब्राझिलियन युवा खेळाडूने आक्रमक रणनीती अवलंबली. बेसलाइनवरून मारलेले जोरदार फटके, निर्णायक क्षणी केलेल्या दमदार सर्व्हिस यामुळे त्याने जोकोविचला बचावात्मक खेळण्यास भाग पाडले. जागतिक क्रमवारीतील अव्वल खेळाडू यानिक सिनर स्पर्धेतून आधीच बाहेर पडला होता, तर गतविजेता कार्लोस अल्काराझ दुखापतीमुळे स्पर्धेत सहभागी होऊ शकला नव्हता. अशा परिस्थितीत विक्रमी २५ वे ग्रँड स्लॅम विजेतेपद जिंकण्याची सुवर्णसंधी जोकोविचकडे होती. मात्र, फोन्सेकाकडून झालेल्या पराभवामुळे त्याचे हे स्वप्न भंगले.

# फायनलपूर्वी आरसीबीच्या चाहत्यांना धक्का!

### सेलिब्रेशनवर पोलिसांकडून बंदी

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्याच्या अगदी आधी आरसीबीच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. शुक्रवारी बंगळूर पोलिसांनी एक सूचना जारी करून लोकांना आरसीबीच्या विजयाचा जल्लोष करण्यासाठी फटाके न फोडण्याचे किंवा रस्त्यावर मोठ्या संख्येने एकत्र न जमण्याचे आवाहन केले आहे. गेल्या वर्षी ४ जून रोजी बंगळूरमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा बळी गेला होता, तशीच ही घटना आहे.

आयपीएल २०२६ चा अंतिम सामना रविवार, ३१ मे रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाईल. विजेतेपदाच्या लढतीत रॉयल चॅलेंजर्स बंगळूर आणि गुजरात टायटन्स आमने-सामने येतील. बंगळूर २०२५ च्या हंगामाचे विजेते होते, तर गुजरात २०२२ च्या हंगामाचे विजेते होते. दोघांनाही दुसऱ्यांदा चॅम्पियन बनण्याची सुवर्णसंधी आहे.

बंगळूर पोलिसांनी एक सूचना जारी केली आहे, ज्यात म्हटले आहे की सामन्यांचे निकाल जाहीर झाल्यानंतर लोकांनी सार्वजनिक ठिकाणी जल्लोष करणे टाळावे. एलईडी पथदिव्यांबाबतही कडक कारवाई करण्यात आली आहे.

### हरमनप्रीत कौरची ऐतिहासिक कामगिरी | निर्णायक सामना २ जूनला रंगणार

# टी-२० सामन्यात भारताचा पराभव

**। इंग्लंड । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला संघाला इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात २६ धावांनी पराभव पत्करावा लागला आहे. या पराभवामुळे ३ सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत आली आहे. पहिला सामना भारतीय संघाने जिंकला होता. मालिकेतील तिसरा आणि निर्णायक सामना मंगळवार, २ जून रोजी टाउंटन येथे खेळला जाईल.ब्रिस्टलमध्ये इंग्लंडने नाणेफक जिंकून फलंदाजी करताना २० षटकांत ५ गडी गमावून १६८ धावा केल्या. प्रत्युत्तरात



भारतीय संघ २० षटकांत ८ गडी गमावून केवळ १४२ धावाच करू शकला. इंग्लिश अष्टपैलू खेळाडू फ्रेया केम्पने दुहेरी कामगिरी केली. तिने १३ चेंडूत नाबाद ३९ धावा केल्या. तसेच १५ धावा देऊन २ बळी घेतले.

इंग्लंडची सुरुवात संथ झाली होती. पॉवरप्लेनंतर संघाचा स्कोअर १ विकेटवर ३५ धावा होता. भारताची लेफ्ट आर्म स्पिनर एन श्री चरणीने फलंदाजांना मोकळेपणाने खेळण्याची संधी दिली नाही. १७व्या षटकात ४ विकेटवर ११६ धावांच्या स्कोअरवर फ्रेया केम्प क्रीजवर आली. तिने ३०० च्या स्ट्राइक रेटने १३ चेंडूंमध्ये नाबाद ३९ धावा केल्या. शेवटच्या षटकात केम्पने अरुंधती रेड्डीच्या पहिल्या चेंडूवर लॉन्ग ऑनवरून षटकार मारला. नंतर सलग दोन चौके आणि शेवटच्या चेंडूवर आणखी एक षटकार मारून इंग्लंडचा स्कोअर १६८ पर्यंत पोहोचवला. दानी गिब्सननेही तिला साथ दिली. दोघांनी नंदिनी शर्माच्या षटकात १४ धावा जमवल्या होत्या.भारतीय गोलंदाज एन श्री चरणीने मधल्या फळीत इंग्लंडला मोठे धक्के दिले. तिने ४ षटकांत २५ धावा देऊन ३ बळी घेतले. चरणीने आधी डॅनी व्याट-हॉज (३६ धावा) आणि एमी जोन्स यांची भागीदारी तोडली. हॉजचा झेल स्मृती मानधनाने घेतला. त्यानंतर जोन्सला हरमनप्रीत कौरच्या हाती झेलबाद केले.

इंग्लंडची कर्णधार हेदर नाईट पुन्हा एकदा चांगल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत रूपांतर करू शकली नाही.

## आयपीएल विजेता संघ होणार मालामाल

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२६ ची ट्रॉफी जिंकल्यानंतर विजेत्या संघाला किती रक्कम मिळणार याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. मात्र यावर्षीच्या बक्षीस रकमेबाबत बीसीसीआयने अद्याप कोणतीही नवीन घोषणा केलेली नाही. तरीदेखील विजेता आणि उपविजेता संघ मालामाल होणार आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने २०२६ च्या बक्षीस रकमेबाबत अधिकृत माहिती जाहीर केलेली नसली, तरी मागील हंगामाप्रमाणेच बक्षीस रक्कम कायम राहण्याची शक्यता आहे. मागील काही हंगामांपासून आयपीएलचा एकूण बक्षीस निधी सुमारे ४६.५ कोटी रुपये होता. त्यामध्ये विजेत्या संघाला २० कोटी रुपये, तर उपविजेत्या संघाला १३ कोटी रुपये देण्यात येत होते.

२०१६ पासून आयपीएलच्या बक्षीस रकमेतील कोणताही मोठा बदल झालेला नाही. त्यानुसार विजेत्या संघाला २० कोटी रुपये, तर उपविजेत्या संघाला १३ कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. आयपीएलची सुरुवात २००८ मध्ये झाली तेव्हा विजेत्या संघाला केवळ ४.८ कोटी रुपये मिळत होते. तर उपविजेत्या संघासाठी बक्षीस रक्कम २.४ कोटी रुपये होती. यानंतर २०१० मध्ये बीसीसीआयने पहिल्यांदा बक्षीस रक्कम वाढवली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)